सोलापूर

Solapur Tarun Bharat

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. २९ जुलै २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १०५ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



## उजनी येथे शेतात काम करताना वीज पडून महिलेचा मृत्यू



**अंबाजोगाई :** अंबाजोगाई तालुक्यातील उजनी येथे सोमवारी सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास वीज पडून एका चाळीस वर्षीय महिलेचा जागीच मृत्यू झाला. अनिता आप्पाराव गव्हाणे असे या मृत महिलेचे नाव असून, त्या स्वतःच्या शेतात खुरपणीचे काम करत असताना ही धक्कादायक घटना घडली. अचानक आलेल्या निसर्गाच्या या प्रकोपामुळे परिसरात मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे. अनिता गव्हाणे या त्यांच्या जावेसोबत शेतातील कामे उरकत होत्या. ढगाळ वातावरण निर्माण झाल्याने त्यांच्या जावेने त्यांना लवकरात लवकर घराकडे परतण्याचा आग्रह केला होता. मात्र, उरलेले थोडे काम संपवूनच मी घरी येते, असे सांगून अनिता यांनी जावेला पुढे पाठवले. जावेला घरी पाठवल्यानंतर काही वेळातच शेतात अचानक जोरदार वीज कोसळली आणि यामध्ये अनिता यांचा जागीच दुर्दैवी अंत झाला.

या दुर्दैवी घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी तात्काळ प्रशासनाला अवगत केले. उजनी सजाचे तलाठी बिडवे, मंडळ अधिकारी स्वामी आणि बर्दापूर पोलीस ठाण्याचे बीट अंमलदार गोविंद फड यांना या घटनेची तातडीने माहिती देण्यात आली. प्रशासकीय अधिकारी आणि पोलिसांनी घटनेची नोंद घेत पुढील कायदेशीर आणि प्रशासकीय कार्यवाही सुरू केली आहे.

## अंबाजोगाईत तिरट जुगारावर पोलिसांचा छापा; दोन लाखांचा मुद्देमाल जप्त, चौघांवर गुन्हा दाखल

**अंबाजोगाई :** अंबाजोगाई: अंबाजोगाई शहरालगतच्या शेपवाडी शिवारातील अजय हॉटेलच्या पाठीमागे बेकायदेशीररित्या तिरट नावाचा जुगार खेळणाऱ्या चौघांवर अंबाजोगाई शहर पोलिसांनी छापा टाकून मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी रोख रकमेसह मोबाईल आणि दुचाकी असा एकूण दोन लाख आठ हजार आठशे रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस कॉन्स्टेबल हनुमंत चादर यांच्या फिर्यादीनुसार, २५ जुलै रोजी सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास काही तरुण अजय हॉटेलच्या पाठीमागे गोलाकार बसून पैशांवर तिरट जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस निरिक्षक शरद जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली शहर पोलिसांनी छापा टाकला असता प्रेम शिवाजी जाधव (वय २५, रा. पुस, ह.मु. नागझरी परिसर, अंबाजोगाई), अतीक फारुक शेख (वय २४, रा. पिंपळा धायगुडा), मयुर मधुकर भिसे (वय २४, रा. पिंपळा धायगुडा) आणि मयुर लहु (वय २२, रा. पिंपळा धायगुडा) हे जुगार खेळताना रंगेहाथ पकडले गेले.

या कारवाईत पोलिसांनी जुगाराच्या डावावरील रोख रक्कम, पत्ते, वेगवेगळ्या कंपन्यांचे महागडे मोबाईल फोन आणि दोन मोटारसायकली असा मोठा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम १८८७ च्या कलम १२ (अ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार नागरगोजे आणि मुंडे हे करत आहेत.

## ॲड. अजित लोमटे यांना पितृशोक; राजेसाहेब लोमटे यांचे दु:खद निधन

**अंबाजोगाई :** अंबाजोगाई वकील संघाचे माजी अध्यक्ष ॲड. अजित लोमटे यांचे वडील आणि अंबाजोगाई बस आगारातील सेवानिवृत्त कर्मचारी राजेसाहेब काशीनाथराव लोमटे यांचे आज पहाटे दुःखद निधन झाले. त्यांच्या या आकस्मिक जाण्याने लोमटे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

राजेसाहेब लोमटे यांच्यावर गेल्या अनेक दिवसांपासून हैदराबाद येथे वैद्यकीय उपचार सुरू होते. आज ते पुढील तपासणीसाठी जाणार होते, मात्र त्यापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाची बातमी समजताच अंबाजोगाई शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# अंबाजोगाई मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या निवडणुकीत परिवर्तन पॅनलचा दणदणीत विजय



**अंबाजोगाई :** अंबाजोगाई मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या निवडणुका अंबाजोगाईत नुकत्याच घेण्यात आल्या. या निवडणुकीमध्ये परिवर्तन पॅनलच्या नवख्या उमेदवारांनी बहुमताने विजय प्राप्त करीत विजयाचा चौकार मारला. या निवडणुकीनंतर झालेल्या अंबाजोगाई मेडीकल प्रॅक्टीशनर्स असोसिएशनच्या सर्वसाधारण सभेत नवीन कार्यकारिणीची दोन वर्षे कालावधीसाठी निवड करण्यात आली. यावेळी सर्वानुमते कार्यकारीणी निवडण्यात आली. या नूतन कार्यकारणी मध्ये पदाधिकारी म्हणून अध्यक्षपदी डॉ.निशिकांत पाचेगावकर, उपाध्यक्षपदी डॉ.प्रिया मुळे, सचिवपदी डॉ.संदीप जोगदंड, सहसचिवपदी डॉ.नजीर, अस्लम खान, डॉ.इम्रान पटेल तसेच कोषाध्यक्षपदी डॉ.स्वाती हारे, क्रीडा सचिवपदी डॉ.वेणुगोपाल आगळे, डॉ.पूजा लोमटे, सांस्कृतिक समिती सचिवपदी डॉ.सचिन कस्तुरे, डॉ.स्नेहल पेस्टे, कार्यकारिणी सदस्य म्हणून डॉ.शिवाजी मस्के, डॉ.प्रवीण जोशी यांची निवड करण्यात आली. निवडणुका झाल्यानंतर परिवर्तन पॅनलच्या वतीने डॉ.राजेश इंगोले, डॉ.प्रशांत पाटील, डॉ.अतुल देशपांडे, डॉ.सुलभा पाटील, डॉ.प्रल्हाद गुरव, डॉ इम्रान अली, डॉ.प्रदीप सोनवणे, डॉ.योगेश मुळे, डॉ.संदीप जैन, डॉ.देवराव चामणर, डॉ.बाळासाहेब हाके, डॉ.सुमित केंद्रे, डॉ.सुनील नांदलगावकर, डॉ.बळीराम मुंडे, डॉ.विजय लाड या पॅनलच्या प्रवर्तकांनी सर्व मतदारांचे आभार मानले आणि निवडून आलेल्या सर्व उमेदवारांचे शाल, श्रीफळ देवून फेटा बांधून आणि गुलाल उधळून सत्कार केला.

## राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत शाश्वती शरद जावळे ची चमकदार कामगिरी



**माजलगाव :** (प्रतिनिधी)

सनराईज एज्युकेशन सोसायटी, पुणे संचलित इन्स्पायर अबॅकस अकॅडमीच्या वतीने आयोजित राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धा रविवार, दिनांक २६ रोजी अहिल्यानगर येथे उत्साहात पार पडली. या स्पर्धेत बीड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले असता माजलगाव येथील कु. शाश्वती शरद जावळे हिने या राष्ट्रीय स्पर्धेत पाचवा क्रमांक पटकावत चॅम्पियन ट्रॉफी मिळवून माजलगावच्या शैक्षणिक क्षेत्रात मानाचा तुरा रोवला आहे.

राष्ट्रीय स्तरावरील या स्पर्धेत राज्यभरातून हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. इन्स्पायर अबॅकस क्लासेस बीड येथील विद्यार्थ्यांनी अवघ्या पाच मिनिटांत बोटांवर आकडेमोड करून १०० हून अधिक गणिते सोडविण्याची कौशल्यपूर्ण कामगिरी केली. त्यांच्या या असामान्य वेगाने व अचूकतेने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते चॅम्पियन ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. शाश्वती जावळे हिच्या या यशामागे बेस्ट टीचर अवॉर्ड प्राप्त अबॅकस शिक्षिका शिला जावळे मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यातील शेकडो विद्यार्थी ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने अबॅकसचे प्रशिक्षण घेत आहेत.

राष्ट्रीय स्पर्धेत पाचवा क्रमांक पटकावत चॅम्पियन ट्रॉफी मिळविल्याबद्दल महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयाच्या वतीने शाश्वती जावळे हिचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांनी तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

शाश्वतीच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शिक्षण क्षेत्रासह विविध स्तरांतून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून तिच्या यशामुळे माजलगावच्या शैक्षणिक क्षेत्राची मान उंचावली आहे.

## पूर्णवादी बँकेच्या जालना रोड शाखेत रक्तदान शिबिर संपन्न

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी - प.पु.पूर्णवाद प्रणेते डॉ.रामचंद्र महाराज पारनेरकर (२९.०७.२०२६) आणि प. पु. पूर्णवाद वर्धिष्णू डॉ. विष्णु महाराज पारनेरकर (२७.०७.२०२६) यांचे जन्मतिथी निमित्त पूर्णवादी बँकेच्या जालना रोड शाखेत रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. यावेळी राज्याचे इमाव तथा दुग्ध विकास मंत्री ना.अतुलजी सावे, बँकेचे संचालक अमीत देशपांडे बँकेच्या संचालिका जयश्री रायते, पूर्णाचार्य श्री आनंदरावजी मुठाळ, पूर्णवाद पॉलिटिकल सायन्स अकॅडमीचे उपाध्यक्ष व शिवसेना ठाकरे पक्षाचे युवा नेते गौरव पुरंदरे, पूर्णवाद एनजीओचे राहुल दाशरथे यांच्या हस्ते प्रतीमा पूजन व दीप प्रज्वलन शिबिरास सुरवात करण्यात आली.

यावेळी व्यावसायिक तथा गुरुबंधू सर्वश्री व्यंकटेश मालखरे, चंद्रकांत कुलकर्णी, धनंजय अकोलकर, विशाल वाळके, अमरेश रायते साहेब सहकारी मंगेश निरंतर, प्रवीण देशमुख, यांच्या सह बँकेच्या सभासदांनी उत्तम प्रतिसाद दिला. शिबिरासाठी अनेकांनी शाखेस भेट देऊन रक्तदान केले. यावेळी शाखेस भेट दिलेल्या सभासदांना व नागरिकांना बँकेच्या विविध कर्ज व ठेव योजनेची माहिती दिली. सदर स्तुत्य उपक्रमाबाबत सर्वांनी समाधान व्यक्त केले. तसेच बँकेच्या उत्तरोत्तर प्रगतीकरिता शुभेच्छा दिल्या. यशस्वी आयोजनासाठी शाखाधिकारी पांडव व अधिकारी- कर्मचारी तसेच दत्ताजी भाले रक्त पेढीने प्रयत्न केले.

# आदर्श गुरुकुलचा दिंडी सोहळा उत्साहात; गुरुकुल मध्ये अवतरली पंढरी



**माजलगाव/प्रतिनिधी:** भारतीय जन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित आदर्श गुरुकुलची आषाढी एकादशी निमित्त दि.२५ शनिवार रोजी बालदिंडी उत्साहात भक्तिमय आणि शिस्तबद्ध वातावरणात साजरी करण्यात आली. आदर्श गुरुकुलचे मार्गदर्शक श्री. केशव बादाडे, अध्यक्षा सावित्री बादाडे,संचालक ओंकार बादाडे, अंजली घाडगे मॅडम, तुकाराम शिंदे सर यांच्या हस्ते श्री. विठ्ठल - रखुमाईच्या प्रतिमेचे पूजन करून दिंडीची सुरुवात करण्यात आली.

विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणी, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत मुक्ताई आदींच्या वेशभूषाने तसेच डोक्यावर ग्रंथ, तुळशीवृंदावन, कलश, झेंडा पताका त्याचबरोबर सर्व विद्यार्थी मुलींनी काष्टा साडी परिधान करून व मुले पांढरा गुरु शर्ट टोपी रुमाल घेऊन, कपाळी गोपीचंदन टिळा लाऊन उपस्थितांचे मने जिंकली. टाळ मृदंग वाजत गाजत, पावल्या आणि फुगड्या खेळत, ज्ञानोबा माऊली तुकाराम! विठोबा रखुमाई! जयघोष करत भक्तीरसात न्हालेले वातावरणात श्री. केशवराजाच्या चरणी निस्सिम भक्ती अर्पण केली.विद्यार्थ्यांनी शिक्षण, आरोग्य, स्वच्छता,पर्यावरण रक्षण, सामाजिक बांधिलकी, महिला सन्मानाचा सामाजिक संदेश दिला.दिंडीच्या मार्गावर जागोजागी फराळ, फळे, चहा वाटप होता त्याचा आस्वाद घेतला. विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी यांनी श्री. केशवराजाच्या प्राणांगणात फुगडीचा आनंद घेतला नंतर मंदिरात शिस्तीत रांगेत दर्शन घेतले. गुरुकुलामध्ये दिवसभर विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून भक्तिमय वातावरनात पंढरी अवतरली.शेवटी प्रसाद वाटप करून दिंडीची सांगता करण्यात आली.

दिंडीचे नियोजन मार्गदर्शक केशव बादाडे, तसेच संचालक ओंकार, तुकाराम शिंदे सर, अधीक्षक स्वरूपा बादाडे, उर्मिला बादाडे, लहू पवार यांच्यासह अनेकांची सहकार्य लाभले.

## आषाढी एकादशी निमित्त श्री कलोपासक प्रतिष्ठान केज आयोजित तालुकास्तरीय भजन स्पर्धेमध्ये-स्वामी विवेकानंद शाळेतील विद्यार्थ्यांचे नेत्रदीपक यश



**केज प्रतिनिधी :** दि. २७ जुलै- आषाढी एकादशीच्या पावन निमित्ताने श्री कलोपासक प्रतिष्ठान, केज यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली तालुकास्तरीय भजन स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. ६ ते १६ वर्ष या वयोगटातील बालस्पर्धकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेला तालुकाभरातून मोठा प्रतिसाद लाभला. एकूण ३६ स्पर्धकांनी सहभाग घेत आपल्या सुरेल आवाजाने आणि भावपूर्ण सादरीकरणाने उपस्थित रसिकांची मने जिंकली. सदरील स्पर्धेमध्ये स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग केज या शाळेतील १० वी मधील विद्यार्थिनी सुनिष्ठा उमाकांत बोधणे ही तालुक्यातून सर्वद्वितीय आली. तर ५ वी मधील धनश्री बाबू गदळे हिने उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविले.

वरील यशस्वी विद्यार्थ्यांना शाळेतील सहशिक्षक भालचंद्र केजकर यांचे मार्गदर्शन लाभले. या विद्यार्थिनींचा शाळेचे प्र. मु. अ. श्रीकिशन नेहरकर, ज्येष्ठ शिक्षक अजय देशपांडे, यांच्या उपस्थितीमध्ये सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शाळेतील सर्व शिक्षकवृंदही उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे यांनी केले.

## नादुरुस्त रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करुन एस.टी. बस सेवा सुरु करा : अमर देशमुख



**अंबाजोगाई :** कोळकानडी - माकेगाव - हिवरा - वरपगाव - सोमनाथ बोरगाव - धानोरा - आपेगाव तसेच या मार्गावरील सर्व गावांचे नादुरूस्त रस्ते तातडीने दुरूस्त करून एस.टी. बस सेवा सुरु करावी अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अंबाजोगाई तालुकाध्यक्ष अमर देशमुख यांनी सोमवारी उपजिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

**राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अंबाजोगाई तालुकाध्यक्ष अमर देशमुख यांनी सोमवार, दिनांक २७ जुलै रोजी उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, कोळकानडी, माकेगाव, हिवरा, वरपगाव, सोमनाथ बोरगाव, धानोरा, आपेगाव तसेच या मार्गावरील इतर सर्व गावांतील नागरिकांना दळणवळणाच्या गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या मार्गावरील रस्ते अनेक ठिकाणी अत्यंत खराब, खड्डेमय व वाहतुकीस अयोग्य झाले आहेत. त्यामुळे विद्यार्थी, शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक, रूग्ण तसेच सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या प्रमाणावर गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. रस्त्यांची दुरवस्था असल्यामुळे राज्य परिवहन महामंडळाची (एस.टी.) बस सेवा या मार्गावर नियमितपणे उपलब्ध नाही. परिणामी नागरिकांना खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागत असून त्यासाठी ज्यादा आर्थिक खर्च सहन करावा लागत आहे. तसेच आपत्कालीन परिस्थितीत रूग्णांना वेळेवर वैद्यकीय सेवा मिळण्यातही अडचणी निर्माण होत आहेत. तरी आपण या गंभीर बाबीची तातडीने दखल घेऊन पुढील प्रमाणे कार्यवाही करावी :** कोळकानडी - माकेगाव - हिवरा - वरपगाव - सोमनाथ बोरगाव - धानोरा - आपेगाव या संपूर्ण मार्गावरील रस्त्यांची तातडीने दुरूस्ती व मजबुतीकरण करण्यात यावे, या मार्गावरील सर्व गावांना जोडणारी राज्य परिवहन महामंडळाची (एस.टी.) बस सेवा तात्काळ सुरू करण्यात यावी. विद्यार्थी, शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक व सर्वसामान्य नागरिकांच्या सोयीसाठी नियमित बस फेऱ्यांचे नियोजन करण्यात यावे. संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना देऊन या कामास प्राधान्याने मंजुरी देण्यात यावी. आपण जनहिताचा विचार करून वरील मागण्यांवर तातडीने सकारात्मक कार्यवाही कराल, अशी आम्हां सर्व नागरिकांची अपेक्षा आहे. या सर्व मागण्या मान्य नाही केल्या तर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा सदरील निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. निवेदन बजरंग बप्पा सोनवणे (खासदार, बीड), सौ.नामिताताई मुंदडा (आमदार, केज विधानसभा), आगारप्रमुख, महाराष्ट्र परिवहन मंडळ, अंबाजोगाई आणि मुख्य कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई यांना माहितीस्तव देण्यात आले आहे. सदरील निवेदन देताना राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अंबाजोगाई तालुकाध्यक्ष अमर देशमुख, तानबा लांडगे, ॲड.इस्माईल गवळी, कल्याण भिसे, रामकिसन मस्के, अंकुश ढोबळे, दिपक शिंदे, हमीद चौधरी, ॲड.प्रशांत पवार, ऋषिकेश सोमवंशी, व्यंकटेश चामनर, अर्शद खान पठाण, नारायण मुळे आदींसह अनेकांची उपस्थिती होती.

**वसमतनगर नगरपरिषद;वसमतनगर**

(स्थापना1952) Phone 02454-220175 जिल्हा:-हिंगोली cobasmat@gmail.com

जा.क्र./नपव/स्ववि/1884/2026 दिनांक :28/07/2026

**सार्वजनिक सूचना.**

**घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ ची अंमलबजावणी बाबत**

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल विभागाच्या दिनांक २७ जानेवारी २०२६ च्या अधिसूचनेनुसार घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ निर्गमित करण्यात आलेले असून सदर नियम दिनांक १ एप्रिल २०२६ पासून अंमलात आले आहेत.

सर्व नागरिक, व्यापारी, संस्था, गृहनिर्माण संस्था, आस्थापना, लोकप्रतिनिधी तसेच मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणारे घटक (Bulk Waste Generators) यांना सूचित करण्यात येते की सदर नियमांनुसार व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या नागरी अपील क्र. ६१७४ / २०२३ मधील आदेशानुसार प्रत्येक नागरिक व संस्थेवर कचरा वर्गीकरण व वैज्ञानिक व्यवस्थापनाची जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे.

**नियमांनुसार प्रत्येक घर, दुकान, आस्थापना, कार्यालय, हॉटेल, बाजारपेठ, संस्था व इतर कचरा निर्मात्यांनी खालीलप्रमाणे कचऱ्याचे स्त्रोतावरच वर्गीकरण करणे बंधनकारक राहील-**

- ओला कचरा अन्न, भाजीपाला अवशेष, स्वयंपाकघरातील कचरा
- सुका कचरा - प्लास्टिक, कागद, धातू, काच इत्यादी
- सॅनिटरी कचरा डायपर्स, सॅनिटरी नॅपकिन्स इत्यादी
- विशेष / घातक कचरा बॅटरी, बल्ब, औषधे, ई-कचरा इत्यादी

**नागरिकांची जबाबदारी :**

- घरगुती कचऱ्याचे चार प्रकारात वर्गीकरण करूनच स्वच्छता कर्मचाऱ्यांकडे / घंटागाडीत सुपूर्द करणे.
- सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये.
- प्लास्टिक, बांधकाम कचरा, ई-कचरा इत्यादी स्वतंत्रपणे देणे.
- ओला व सुका कचरा मिसळून न देणे.
- सॅनिटरी कचरा सुरक्षितरीत्या गुंडाळून देणे.
- कचरा जाळणे, नाले / रस्त्यावर टाकणे किंवा उघड्यावर फेकणे टाळणे.

**लोकप्रतिनिधींची जबाबदारी :**

- आपल्या प्रभागात / वॉर्डात जनजागृती करणे.
- नागरिकांना कचरा वर्गीकरणासाठी प्रोत्साहन देणे.
- स्वच्छता, कचरा प्रक्रिया व पर्यावरण संरक्षणाबाबत सक्रिय सहभाग घेणे.
- स्थानिक स्वराज्य संस्थेस सहकार्य करून नियमांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करणे.

**Bulk Waste Generators (मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणारे) यांची जबाबदारी :**

- ज्या संस्था/इमारती/संकुले यांचे क्षेत्रफळ २०,००० चौ. मी. पेक्षा जास्त आहे किंवा दररोज १०० किलोपेक्षा अधिक कचरा निर्माण होतो अथवा ४०,००० लिटरपेक्षा जास्त पाण्याचा वापर होतो, अशा आस्थापनांना Bulk Waste Generators म्हणून घोषित करण्यात आले आहे.

**अशा संस्थांनी-**

- ओल्या कचऱ्याची जागेवरच कंपोस्ट / बायोगॅस प्रक्रिया करणे,
- कचऱ्याची स्वतंत्र साठवणूक व वर्गीकरण करणे,
- प्रक्रिया न झालेला कचरा उघड्यावर टाकू नये,
- महानगरपालिका / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सूचनांचे पालन करणे,
- अधिकृत कचरा प्रक्रिया यंत्रणेशी समन्वय ठेवणे बंधनकारक राहील.
- नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती, संस्था किंवा आस्थापनांवर "Polluter Pays Principle" नुसार दंडात्मक कारवाई व पर्यावरण भरपाई आकारण्यात येईल.
- तरी सर्व नागरिकांनी स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक शहर निर्मितीसाठी घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ चे काटेकोर पालन करावे, ही विनंती.

स्वा/-
**मुख्याधिकारी**
नगरपरिषद वसमत

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महिलांना बचत गटांच्या व्याजदरामध्ये सूट देणार

तभा वृत्तसेवा

लातूर : महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेच्या माध्यमातून सभासद व ग्राहकांना विश्र्वासात घेऊन बैंकेची चौफेर प्रगती साधण्याचे कार्य सुरू आहे

बँकेच्या कार्याला सामाजिक बांधिलकीची जोड व्हावी यासाठी एमएनएस बँकेच्या माध्यमातून बचत गटाच्या महिलांना विनातारण १ लाखापर्यंतचे कर्ज देण्याची प्रक्रिया सुरू केली. यामध्ये जवळपास हजारो बचत गटाच्या महिलांना उद्योगासाठी विणातारण कर्ज देण्यात आले. परंतु सहा वर्षापूर्वी आलेल्या कोरोना संकटामुळे बचत गटाच्या कर्जदाराची थकबाकी मोठ्या प्रमाणावर राहिली असल्याचे समोर आलेले आहे.

त्यामुळे या प्रक्रियेवर तोडगा म्हणून बँकेने दिलेल्या कालावधीमध्ये मुद्दल व व्याजाची भरपाई करणाऱ्या बचत गटाच्या महिलांना व्याजामध्ये १५ टक्के सुट देऊन विकासाच्या प्रवाहात आणण्याचा निर्णय बँकेने घेतला असल्याचे बँकेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केली. महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेच्या मायक्रो फायनांन्सच्या माध्यमातून देण्यात आलेल्या कर्जदार बचत गटाच्या महिला मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्रा नागरी सहकारी बँकेचे उपकार्यकारी संचालक किशनसिंह गहरवार, बँकेचे शाखा व्यवस्थापक प्रविण जाधव, पंकज पाटील सुमित चव्हाण, सुधीर कांबळे, श्रध्दा कावळे, अनिता पाचंगे आदी मान्यवर उपस्थित होते.



## विविध वृत्त.....

### शालेय क्रीडा स्पर्धांच्या आयोजनासाठी महानगरपालिका स्पर्धापूर्व बैठकांचे आयोजन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २८ जुलैः क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत लातूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद व लातूर महानगरपालिका लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने सन २०२६-२०२७ या वर्षातील शालेय तालुकास्तर, जिल्हास्तर व महानगरपालिकास्तर क्रीडा स्पर्धांच्या आयोजन नियोजनासाठी स्पर्धापूर्व बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे.

यानुसार अहमदपूर तालुक्याची बैठक ३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता अहमदपूर येथील अहिल्यादेवी होळकर विद्यालय येथे, चाकूर तालुक्याची बैठक ३ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ३ वाजता चापोली येथील संजीवनी विद्यालय येथे, जळकोट तालुक्याची बैठक ४ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता जळकोट येथील महात्मा फुले महाविद्यालय येथे, तर देवणी व उदगीर या दोन्ही तालुक्यांसाठी ४ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ३ वाजता उदगिरी महाविद्यालय येथे बैठक पार पडणार आहे.

तसेच निलंगा व शिरूर अनंतपाळ या दोन्ही तालुक्यांसाठी ५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालय येथे, औसा तालुक्यासाठी ५ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ३ वाजता आलमला येथील शिवलिंगेश्र्वर कॉलेज ऑफ फार्मसी येथे, लातूर व रेणापूर या दोन्ही तालुक्यांसाठी ६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता लातूर येथील डॉ. विश्र्वनाथ कराड वर्ल्ड पीस स्कूल येथे आणि लातूर शहर महानगरपालिकास्तरासाठी ६ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ३ वाजता लातूर येथील स्वामी विवेकानंद विद्यालय एम.आय.डी.सी. येथे सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

शालेय क्रीडा स्पर्धांचे नियोजन सुरळीत व वेळेत व्हावे याकरिता जिल्ह्यातील जास्तीत जास्त शाळा, महाविद्यालये आणि क्रीडा शिक्षकांनी या बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन लातूरचे जिल्हा क्रीडा अधिकारी जयराज मुंढे यांनी केले आहे.

## यशवंतराव पाटील विद्यालयात सायबर सुरक्षा जनजागृती

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २८ जुलै : येथील राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर व क्रिक हिल फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्ह्यात 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' हा जनजागृती उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत यशवंतराव पाटील विद्यालय, हरंगुळ(बु), लातूर येथे विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले.

दि. २७ जुलै २०२६ रोजी सकाळी १०:२० ते १२.०० या वेळेत पार पडलेल्या या सत्रामध्ये इयत्ता ५ वी ते ८ वी मधील विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी सायबर वॉरिअर पायल साबणे व सायबर वॉरिअर पाटील सृष्टी यांनी विद्यार्थ्यांना फोटो मॉर्फिंग म्हणजे काय, कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) च्या माध्यमातून फोटो कसे तयार केले जातात, -ख चा सुरक्षित व जबाबदारीने वापर, मजबूत (डीपस) पासवर्ड कसा तयार करावा याची उदाहरणांसह माहिती दिली. तसेच मोबाईलमध्ये कोणतेही प डाऊनलोड करताना कोणत्या परवानग्या (झशीार्ळीीळेपी) द्याव्यात आणि कोणत्या परवानग्या देणे टाळावे, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ऑनलाइन फसवणूक, बनावट लिंक, जॉब फसवणूक आणि सोशल मीडियाचा सुरक्षित वापर याविषयीही महत्त्वपूर्ण माहिती देण्यात आली.

संवादात्मक पद्धतीने पार पडलेल्या या सत्रात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्र्न विचारले. प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून सायबर सुरक्षेचे महत्त्व प्रभावीपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आले.

या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक सौ अर्चना कोटगिले मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री पाटील सर , भोंग सर ,स्वामी मॅडम व प्रमोद टेकळे सर यांनी विशेष सहकार्य केले.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना सुरक्षित डिजिटल सवयी अंगीकारून जबाबदार डिजिटल नागरिक बनण्याचे आवाहन करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत Solapur Tarun Bharat

छोट्या जाहिराती/जाहीर प्रगटन / इतर जाहिराती योग्य दरात छापल्या जातील संपर्क –७३८५५६७०३१

## आरतीमुळे समाजात भक्ती आणि एकतेची भावना वाढते
## ह.भ.प. डॉ. सुदाम महाराज पानेगावकर




तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २८ जुलै : चंद्रभागेच्या आरतीमुळे केवळ धार्मिक विधीच होत नाही, तर समाजात भक्ती, श्रद्धा आणि एकतेची भावना वाढते. डॉ. विश्र्वनाथ कराड यांनी सुरू केलेली ही आरतीची प्रथा वारकऱ्यांचे मन परिवर्तन करते. सामूहिक आरतीमुळे हजारो भाविक, वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. असे विचार ह.भ.प. डॉ. सुदाम महाराज पानेगावकर यांनी व्यक्त केले.

विश्र्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत, श्री क्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समितीच्या वतीने पवित्र चंद्रभागेची आरती या नित्य उपक्रमाचा एक भाग म्हणून आषाढ शुद्ध एकादशीच्या पूर्व संध्येला पंढरपूर येथील भक्त पुंडलिक घाटावर ह.भ.प. डॉ. सुदाम महाराज पानेगावकर यांच्या हस्ते चंद्रभागेची आरती संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी सौ. उषा विश्र्वानाथ कराड, गोदावरीताई मुंडे, प्रा. स्वाती कराड चाटे, संजीवनी कराड आणि प्रा.डॉ. विश्र्वनाथ दा. कराड यांच्या परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते.

ह.भ.प. डॉ. सुदाम महाराज पानेगावकर म्हणाले, या आरती मुळे भक्तांमध्ये सेवा भाव अधिक निर्माण होतो. प्रत्येकांची सेवा करने ही आम्हाला संतांनी दिलेली शिकवण आहे. त्यामुळे त्यांच्या पाऊलांवर चालणे हे सर्व वारकर्यांचे कर्तव्य आहे. आज संपूर्ण जगात संत ज्ञानेश्र्वर व तुकाराम महाराज यांचा संदेश पोहचले आहे. वारकरी संप्रदायाची परंपरा विनम्रता शिकविते. चंद्रभागा आरती ही पंढरीची ओळख आहे. या परंपरेच्या माध्यमातून घराघरात भक्ती वाढते आणि माऊलींचे विचार पुढच्या पिढीपर्यंत पोहोचतो.

ह.भ.प. शालिग्राम खंदारे यांनी सूत्रसंचालन केले.

## राज्यस्तरीय शेतीमित्र पुरस्कारप्राप्त विठ्ठल कटके यांचे आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून अभिनंदन



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २८ जुलै : महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत दिला जाणारा राज्यस्तरीय 'वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार' रेणापूर येथील ज्येष्ठ पत्रकार विठ्ठल कटके यांना मिळाल्याबद्दल त्यांचा यथोचित सत्कार करून भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी अभिनंदन केले.

मुंबई येथे कृषी दिनी आयोजित एका कार्यक्रमात राज्याचे महामहीम मा. राज्यपाल जिष्णूदेव वर्मा आणि कृषीमंत्री दत्तात्रय भरणे व इतर अनेक मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. शेतीविषयक समस्या, शेतकऱ्यांच्या अडचणी, कृषी विभागाच्या विविध योजना तसेच शेतीतील सकारात्मक प्रयोग यांना प्रसिद्धी देत विठ्ठल कटके यांनी कृषी क्षेत्राशी संबंधित विषय सातत्याने मांडले. त्यांच्या या कार्याची शासनस्तरावर दखल घेत राज्यस्तरीय वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्काराने गौरव करण्यात आला.

सदरील पुरस्कार मिळाल्याबद्दल लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील रेणापूर येथील ज्येष्ठ पत्रकार विठ्ठल कटके यांचा यथोचित सत्कार करून भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी अभिनंदन केले. यावेळी रेणापूर तालुक्यातील विविध वृत्तपत्राचे पत्रकार रफीक शिकलकर, सिद्धार्थ चव्हाण, चंद्रकांत कातळे, सुधाकर दहिफळे, बालाजी कटके, आर. डी. अपसिंगेकर, निजाम शेख, नामदेव शिंदे, ईश्र्वर बद्दर, भरत भोसले, कोंडीराम काळे यांच्यासह अनेक पत्रकार उपस्थित होते.

### अतिक्रमणावर पोलिस आणि मनपाचा ड्राइव्ह सुरू

लातूर : शहरातील वाहतूकीची कोंडी लक्षात घेता लातूर शहरात वारंवार सूचना देऊनही होणारे अतिक्रमण हे वाढत असल्यामुळे लातूर पोलीस, वाहतूक शाखा आणि महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने कारवाईचा ड्राइव्ह सुरु करण्यात आला असून यानुसार शहरातील गंजगोलाई, तसेच राजीव गांधी चौक या परिसरात संयुक्त मोहीम हाती घेत अतिक्रमण आणि वाहतूकीला अडथळा होईल अशी बेशिस्त पार्किंग करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येत आहे.

## वसंतराव नाईक चौकातील सिमेंट बॅरिकेट हटविण्याची मागणी




तभा वृत्तसेवा

लातूर : शहरातील वसंतराव नाईक चौक येथे लावण्यात आलेले सिमेंटचे बॅरिकेट हटवून डिव्हायडर रस्ता पूर्ववत व व्यवस्थित करण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना निवेदन सादर करण्यात आले. या चौकातून शाळा, महाविद्यालये, रुग्णालये व विविध कार्यालयांकडे मोठ्या प्रमाणात नागरिकांची ये-जा होत असल्याने बॅरिकेटमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. विशेषतः शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व रुग्णांना मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे सिमेंटचे बॅरिकेट तातडीने हटवून रस्ता पूर्ववत करावा व वाहतूक सुरळीत सुरू करावी, अशी मागणी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष सुरेश राठोड यांनी पालकमंत्र्यांकडे केली आहे. नागरिकांच्या सोयीसाठी प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

## आरक्षण उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ लातुरात अभूतपूर्व महामोर्चा



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २८ जुलै : अनुसूचित जातींमधील आरक्षणाचे उपवर्गीकरण सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तात्काळ लागू करण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी सोमवारी लातूर शहरात समस्त मातंग समाज व अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण संघर्ष समिती, लातूर जिल्ह्याच्या वतीने भव्य महामोर्चाचे आयोजन करण्यात आले. या महामोर्चाला जिल्हाभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून महिला, पुरुष, युवक-युवतींसह ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. उपस्थितीच्या दृष्टीने हा मोर्चा यापूर्वी झालेल्या सर्व मोर्चांपेक्षा अधिक भव्य ठरल्याची चर्चा शहरात होती.

साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला अभिवादन करून अण्णाभाऊ साठे चौकातून महामोर्चाला सुरुवात झाली. शहरातील प्रमुख मार्गांवरून शिस्तबद्ध पद्धतीने मार्गक्रमण करत हा मोर्चा जुने जिल्हाधिकारी कार्यालय येथे पोहोचला. संपूर्ण मार्गावर घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

मोर्चामध्ये विविध महापुरुषांच्या प्रतिमा, संविधानाच्या मूल्यांचा गौरव करणारे फलक, तसेच आरक्षण उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ घोषणाबाजी करणारे फलक सहभागींच्या हातात झळकत होते. युवक-युवतींनी मोठ्या उत्साहाने आणि आक्रमक भूमिकेत सहभाग नोंदवत सामाजिक न्यायाच्या मागणीला बुलंद आवाज दिला.

मोर्चेकऱ्यांनी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार अनुसूचित जाती आरक्षणाचे उपवर्गीकरणतातडीने लागू करावे, अशी ठाम मागणी केली. आरक्षणाचा लाभ अनुसूचित जाती प्रवर्गातील सर्व घटकांपर्यंत समतोलपणे पोहोचण्यासाठी उपवर्गीकरण आवश्यक असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

या महामोर्चामध्ये लातूर जिल्ह्यातील मातंग समाजासह अनुसूचित जाती प्रवर्गातील ५९ जातींचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाजबांधवांनी एकजुटीचे दर्शन घडविले.

महामोर्चानंतर जुने जिल्हाधिकारी कार्यालय येथे प्रतिनिधी मंडळाने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर केले. या निवेदनात सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अनुसूचित जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण तात्काळ लागू करावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. निवेदन सादर करताना संघर्ष समितीचे प्रमुख पदाधिकारी, विविध संघटनांचे प्रतिनिधी आणि समाजबांधव उपस्थित होते.

## NEET प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाईची मागणी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २८ जुलै : छएएढ पेपरफुटी प्रकरणातील प्रमुख आरोपी असल्याचा आरोप असलेल्या मोटेगावकर यांच्या आरसीसी क्लासेसवर तात्काळ बंदी घालून त्यांच्यासह संबंधित आरोपींवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सतीश राजेंद्र करंडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, छएएढ पेपरफुटी प्रकरणामुळे देशभरात संतापाची लाट उसळली असून अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व मानसिक नुकसान झाले आहे. या प्रकरणामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले असून लातूरच्या नावाजलेल्या लातूर पॅटर्नलाही मोठा धक्का बसला आहे.

करंडे यांनी आरोप केला आहे की, या प्रकरणातील प्रमुख आरोपींमध्ये मोटेगावकर, कुलकर्णी आणि डॉ. शिरोरे यांचा समावेश असून, त्यांनी आर्थिक स्वार्थासाठी विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात ढकलले. त्यामुळे आरोपींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, आरसीसी क्लासेस तात्काळ बंद करण्यात यावेत, विद्यार्थ्यांनी भरलेली फी परत करण्यात यावी तसेच डॉ. शिरोरे यांचे रुग्णालयही सील करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## डिजिटल युगात सुरक्षिततेचा मंत्र; परिमल विद्यालयात सायबर सुरक्षा जनजागृती

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २८ जुलै : येथील राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर व क्रिक हिल फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्ह्यात 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' हा जनजागृती उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत परिमल माध्यमिक विद्यालय, नारायण नगर, लातूर येथे विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले.

दि. २२ जुलै २०२६ रोजी सकाळी ८.४० ते १०.०० या वेळेत पार पडलेल्या या सत्रामध्ये इयत्ता ८ वी मधील ३०० हून अधिक विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी सायबर वॉरिअर पायल साबणे व सायबर वॉरिअर पाटील सृष्टी यांनी विद्यार्थ्यांना फोटो मॉर्फिंग म्हणजे काय, कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) च्या माध्यमातून फोटो कसे तयार केले जातात, -ख चा सुरक्षित व जबाबदारीने वापर, मजबूत (डीपस) पासवर्ड कसा तयार करावा याची उदाहरणांसह माहिती दिली. तसेच मोबाईलमध्ये कोणतेही प डाऊनलोड करताना कोणत्या परवानग्या (झशीार्ळीीळेपी) द्याव्यात आणि कोणत्या परवानग्या देणे टाळावे, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ऑनलाइन फसवणूक, बनावट लिंक, जॉब फसवणूक आणि सोशल मीडियाचा सुरक्षित वापर याविषयीही महत्त्वपूर्ण माहिती देण्यात आली.

संवादात्मक पद्धतीने पार पडलेल्या या सत्रात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्र्न विचारले. प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून सायबर सुरक्षेचे महत्त्व प्रभावीपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आले.

या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री .श्रीनिवास पाटीलजाधव सर यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री मुळजे सर , बिराजदार सर व प्रशांत सर यांनी विशेष सहकार्य केले.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना सुरक्षित डिजिटल सवयी अंगीकारून जबाबदार डिजिटल नागरिक बनण्याचे आवाहन करण्यात आले.

## तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, शिरूर अनंतपाळ यांच्या न्यायालयात

श्री. गणेश भगवान पांचाळ विरुध्द ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय हिप्पळगाव ज्याअर्थी नामे. योगेश गणेश पांचाळ रा. हिप्पळगाव ता. शिरुर अनंतपाळ जि. लातुर यांचा/ यांच्या मुलाचा/मुलीचा/माताचा/नातीचा जन्म दि. ०७/०८/१९९८ मौजे. हिप्पळगाव ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे झाला आहे. ज्याअर्थी अर्जदार गणेश भगवान पांचाळ रा. हिप्पळगाव ता. शिरूर अनंतपाळ जि. लातुर यांनी या न्यायालयात त्यांच्या मुलाच्या/मुलीच्या/नाताच्या/नातीच्या जन्माची नोंद करण्यासाठी आदेशीत करावे असा अर्ज दाखल केला आहे. त्या पृष्ठयार्थ त्यांनी शपथपत्र व ग्रामपंचायत कार्यालय हिप्पळगाव ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे त्यांच्या जन्माबाबतची नोंद नसल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडलेले आहे.

त्याअर्थी सदरहू नामे योगेश गणेश पांचाळ रा. हिप्पळगाव ता. शिरुर अनंतपाळ जि. लातुर हयाचा/ हिचा जन्म दिनांक. ०७/०८/१९९८ रा. हिप्पळगाव रोजी झाला नाही, असे कोणास सांगावयाचे असेल, तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू नामे योगेश गणेश पांचाळ रा. हिप्पळगाव ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर यांचा जन्म तारखेबाबत लागलहीच पुरावा घेवून अर्जदाराच्या हक्कात सदरहू जन्म तारखेबाबत आदेश देण्यात येईल. पुढील तारीख १५ दिवसानंतर

तहसिलदार तथा दंडाधिकारी
शिरूर अनंतपाळ

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर अनंतपाळ यांचे कार्यालय

(दंडणीय विभाग)

जा.क्रं२०२६एमएजी/कावि-

तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, शिरूर अनंतपाळ यांच्या न्यायालयात कांबळे महेश नंदलाल विरुध्द मुख्याधिकारी, नगरपंचायत कार्यालय शिरूर अनंतपाळ ज्याअर्थी नामे कांबळे महेश नंदलाल रा. शिरूर अनंतपाळ ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर यांच्या मुलीचा जन्म दि.०३/०८/२००८ रोजी मौजे शिरूर अनंतपाळ ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे झाला आहे. ज्याअर्थी अर्जदार कांबळे महेश नंदलाल रा. शिरूर अनंतपाळ यांनी या न्यायालयात त्यांच्या मुलीच्या जन्माची नोंद करण्यासाठी आदेशीत करावे असा अर्ज दाखल केला आहे. त्या पृष्ठयार्थ त्यांनी शपथपत्र व नगरपंचायत शिरूर अनंतपाळ ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे त्यांच्या जन्माबाबतची नोंद नसल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडलेले आहे.

त्याअर्थी सदरहू नामे श्रृत्ती महेश कांबळे रा. शिरूर अनंतपाळ ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर हयाचा/हिचा जन्म दिनांक दि. ०३/०८/२००८ रोजी झाला नाही, असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू नामे श्रृत्ती महेश कांबळे रा. शिरूर अनंतपाळ ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर यांचा जन्म तारखेबाबत लागलीच पुरावा घेवून अर्जदाराच्या हक्कात सदरहू जन्म तारखेबाबत आदेश देण्यात येईल.

तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी
शिरूर अनंतपाळ

## अग्रलेख

# तंत्रज्ञानाला नैतिकतेचा आधार हवा...

भारतातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य स्पर्धा परीक्षा आणि विविध सार्वजनिक परीक्षांच्या पारदर्शकतेवर अवलंबून असते. 'नीट'सारख्या परीक्षांमध्ये झालेल्या पेपरफुटीच्या घटना आणि यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झालेला अविश्वास हा अत्यंत गंभीर आणि संवेदनशील विषय बनला आहे. या समस्येचे मुळापासून उच्चाटन करण्यासाठी आणि संपूर्ण परीक्षा यंत्रणा अधिक सुरक्षित, विश्वासार्ह व पारदर्शक करण्यासाठी केंद्र सरकारने अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. पंतप्रधानांनी एका उच्चस्तरीय कार्यगटाची घोषणा केली असून, याचे नेतृत्व आयटी क्षेत्रातील दिग्गज आणि भारताच्या डिजिटल क्रांतीचे शिल्पकार नंदन निलेकणी यांच्याकडे सोपवण्यात आले आहे. नंदन निलेकणी हे जगभरातील तंत्रज्ञान क्षेत्रातील अत्यंत आदरणीय नाव आहे. 'इन्फोसिस'चे सह-संस्थापक असलेल्या निलेकणी यांनी सार्वजनिक क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर करून सकारात्मक बदल घडवून आणले आहेत. आधार कार्ड देणाऱ्या युनिक आयडेंटिफिकेशन ऑथॉरिटी ऑफ इंडियाचे पहिले अध्यक्ष म्हणून त्यांनी देशातील १३० कोटींहून अधिक नागरिकांना सुरक्षित डिजिटल ओळख मिळवून दिली. ही जगातील सर्वांत मोठी बायोमेट्रिक प्रणाली. नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या माध्यमातून देशात डिजिटल पेमेंटची अभूतपूर्व क्रांती घडवून आणण्यात निलेकणी यांचा वाटा अत्यंत महत्त्वाचा होता. आज भारत डिजिटल व्यवहारांच्या बाबतीत जगात अव्वल स्थानी आहे. ज्याप्रमाणे निलेकणी यांच्या नेतृत्वात 'आधार'द्वारे सुरक्षित डिजिटल ओळख आणि 'यूपीआय'द्वारे सुरक्षित आर्थिक व्यवहार शक्य करून दाखविले गेले, त्याच तंत्रज्ञानाच्या ताकदीचा वापर आता सुरक्षित, पारदर्शक आणि विश्वासार्ह परीक्षा प्रणाली उभारण्यासाठी केला जाणार आहे.

या कार्यगटाची रचना अत्यंत विचारपूर्वक करण्यात आली असून, यामध्ये केवळ संगणक किंवा आयटी क्षेत्रातील तज्ज्ञच नव्हे, तर अंतराळ विज्ञान, सायबर सुरक्षा, उच्च शिक्षण आणि प्रशासकीय क्षेत्रातील दिग्गजांचा समावेश आहे; जेणेकरून सर्वांगीण विचार व्हावा. पारंपरिक 'कागदी' परीक्षा पद्धतीमध्ये (पेपर बेस्ड एक्झाम्स) प्रश्नपत्रिकांच्या छपाईपासून, त्यांच्या वाहतुकीपर्यंत आणि परीक्षा केंद्रांवरील वितरणापर्यंत अनेक टप्प्यांवर मानवी हस्तक्षेप असतो. याच टप्प्यांवर गैरप्रकार किंवा पेपरफुटीचा धोका सर्वाधिक असतो. कार्यगटाकडून ही संपूर्ण साखळी मानवी हस्तक्षेपापासून पूर्णपणे मुक्त करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर होणे अपेक्षित आहे. परीक्षा केंद्रावर प्रवेश करताना विद्यार्थ्यांची आधार-आधारित बायोमेट्रिक ऑथेंटिकेशन आणि चेहरा ओळखणारे (फेस रिकग्निशन) तंत्रज्ञान वापरले गेल्यास डमी उमेदवार परीक्षेला बसवण्याच्या प्रकारांना पूर्णपणे चाप बसेल. प्रश्नपत्रिका आधीच छापून केंद्रांवर पाठवण्याऐवजी, परीक्षेच्या काही मिनिटे आधी थेट परीक्षा केंद्रांवर अत्यंत सुरक्षित (एन्क्रिप्टेड) स्वरूपात डिजिटल पद्धतीने पाठवणे आणि त्या अनलॉक करण्यासाठी विशेष डिजिटल की चा वापर करण्याची पद्धत काही प्रगत देशांत आहे. प्रत्येक परीक्षा केंद्रातील वर्गखोल्यांवर कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर ठेवणे शक्य आहे. वर्गात कोणतीही संशयास्पद हालचाल झाल्यास ही प्रणाली त्वरित अलर्ट जारी करू शकते. परीक्षांचे निकाल, डिजिटल उत्तरपत्रिका आणि गुणपत्रिकांची नोंद ठेवण्यासाठी 'ब्लॉकचेन'चा वापर करण्याचा विचारही होऊ शकतो. यामुळे निकालांमध्ये फेरफार करणे किंवा बनावट गुणपत्रिका तयार करणे अशक्य होईल. जगातील अनेक विकसित देशांनी परीक्षांची सुरक्षितता आणि पारदर्शकता टिकवून ठेवण्यासाठी आधीपासूनच आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार केला आहे. निलेकणी कार्यगट या जागतिक मानकांचाही अभ्यास करणार आहे. अमेरिकेत अनेक राष्ट्रीय पातळीवरील परीक्षा 'ॲडॉप्टिव्ह संगणक आधारित चाचणी' पद्धतीने घेतल्या जातात. या परीक्षा अत्यंत सुरक्षित, प्रमाणित आणि नियंत्रित चाचणी केंद्रांवरच होतात. तेथे उमेदवारांची 'पाम-वेन' (हाताच्या शिरांचे बायोमेट्रिक स्कॅनिंग) पद्धतीने ओळख पटवली जाते. चीनमधील अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या 'गाओकाओ' या राष्ट्रीय प्रवेश परीक्षेत सुरक्षेची अत्यंत कठोर मानके आहेत. परीक्षा केंद्रांवर रेडिओ फ्रिक्वेन्सी सिग्नल जॅमर्स लावलेले असतात, जेणेकरून कोणतेही मोबाईल किंवा ब्लूटूथ डिव्हाईस काम करणार नाही. याशिवाय ड्रोन सर्व्हिलन्स आणि फेशियल रिकग्निशनद्वारे मॉनिटरिंग केले जाते. दक्षिण कोरियातील एका विद्यापीठ प्रवेश परीक्षेदरम्यान प्रश्नपत्रिकांची भौतिक व डिजिटल वाहतूक लष्करी दर्जाच्या सुरक्षेत केली जाते. परीक्षा सुरू असताना संपूर्ण देशातील वाहतूक आणि विमान उड्डाणांवरही नियंत्रणे आणली जातात. ब्रिटन आणि सिंगापूरमध्ये डिजिटल पद्धतीने उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन केले जाते. भारतात दरवर्षी कोट्यवधी तरुण विविध स्पर्धा परीक्षा व शासकीय भरती परीक्षांना बसतात. परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता नसल्यास प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे खच्चीकरण होते. नंदन निलेकणी यांच्या नेतृत्वाखालील कार्यगट भविष्यातील गरजा लक्षात घेऊन अत्यंत सुरक्षित, अत्याधुनिक आणि मानवी हस्तक्षेपापासून मुक्त असा 'डिजिटल परीक्षा आराखडा' तयार करेल, अशी अपेक्षा आहे. पंतप्रधानांनी त्यांना त्याच अपेक्षेनुसार जबाबदारी दिली आहे.

यातील सर्वांत महत्त्वाचा मुद्दा आहे मानवी हस्तक्षेपाचा आणि त्यामुळे मानवी नीतिमत्तेचा. कितीही कडक कायदे केले, एआय किंवा बायोमेट्रिकसारखी प्रगत तंत्रज्ञाने आणली, तरी शेवटी ही यंत्रणा चालवणारी आणि परीक्षा देणारी माणसेच असणार. तंत्रज्ञान गैरप्रकाराचे मार्ग रोखू शकते, पण माणसाची नियत सुधारू शकत नाही. हे लक्षात घेता, तांत्रिक उपाय आणि नैतिक चारित्र्याची निर्मिती या दोन्ही आघाड्यांवर एकाच वेळी काम करणे गरजेचे आहे. परीक्षा हे आयुष्याचे अंतिम ध्येय नसून तो केवळ एक टप्पा आहे, हे विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवणे गरजेचे आहे. अपयशाला सामाजिक कलंक मानणे बंद झाले तर गैरमार्गाचा अवलंब करण्याची प्रवृत्ती आपोआप कमी होईल. पुस्तकी ज्ञान किंवा गुणांची शर्यत म्हणजे शिक्षण नव्हे, हे विद्यार्थ्यांवर बिंबवावे लागेल. जपानसारख्या देशांमध्ये प्राथमिक शिक्षणात पहिल्या काही वर्षांत इतर विषयांपेक्षा स्वच्छता, नागरिकशास्त्र, प्रामाणिकपणा आणि सामाजिक जबाबदारी शिकवली जाते. या उपाययोजनांपासून शिकण्यासारखे आहे. केवळ धडे शिकवण्यापेक्षा, प्रामाणिक राहून मिळवलेल्या यशाचा गौरव करणे आणि गैरमार्गाने मिळवलेले यश शेवटी कसे विनाशकारी ठरते, याचे वास्तविक धडे विद्यार्थ्यांना द्यावे लागतील. नैतिकता ही आतून यावी लागते आणि ती प्रत्येकात नसते. त्यामुळे कायद्याचा धाक असणे आवश्यकच. तांत्रिक सुधारणांसोबतच परीक्षा गैरप्रकारात पकडल्या गेलेल्यांवर, मग तो विद्यार्थी असो, दलाल असो किंवा मोठा अधिकारी; त्यांच्यावर तातडीने आणि कठोर कारवाई झाली पाहिजे. कठोर कारवाई आणि भविष्यातील सर्व परीक्षांसाठी आजीवन बंदी यासारख्या उपायांमुळे गैरप्रकार करण्याचे प्रकार कमी होतील. शिवाय, नैतिकतेची पहिली शाळा कुटुंब ही असते. पालकच मुलांवर अवास्तव अपेक्षांचे ओझे टाकतात. परिणामी मुले आणि त्यांच्यासोबत पालकही गैरमार्गाचा शोध घेऊ लागतात. पालकांनी आपल्या मुलांच्या क्षमतेचा स्वीकार करून त्यांना प्रामाणिकपणाचे महत्त्व पटवून दिले पाहिजे. लक्षात ठेवायचे ते हे की, तंत्रज्ञान हे केवळ दरवाजा बंद करणारे कुलूप आहे. ते कुलूप तोडण्याची हिंमत होऊ नये, यासाठी कायदा हवा तर तशी बुद्धी होऊ नये, यासाठी नैतिकतेची भिंत उभी करावी लागेल. समाजात गैरमार्गाने मिळालेल्या यशापेक्षा प्रामाणिक अपयश अधिक सन्मानकारक असल्याची भावना दृढ होईल, तेव्हाच खऱ्या अर्थाने परीक्षा सुधारणा यशस्वी होतील. ■

## आंतरराष्ट्रीय

# बांगलादेश : राष्ट्रपतींवर राजीनाम्यासाठी दबाव

**प्रा. जयसिंग यादव**

जुलै २०२४ मधील अभूतपूर्व विद्यार्थी आंदोलनाने केवळ शेख हसीना यांचे सरकार उलथवले नाही, तर बांगलादेशच्या सत्तेची संपूर्ण रचनाच बदलली. दशकानुदशके अवामी लीगच्या प्रभावाखाली असलेली प्रशासकीय यंत्रणा, पोलिस, नोकरशाही आणि घटनात्मक संस्थांवर नव्या राजकीय व्यवस्थेची छाप उमटू लागली. अशा परिस्थितीत मोहम्मद शहाबुद्दीन यांच्यासारखे अवामी लीगच्या काळात निवडले गेलेले राष्ट्रपती सत्ताधाऱ्यांना अस्वस्थ करणारे ठरत आहेत. लंडनमध्ये असताना शहाबुद्दीन यांनी भारतात निर्वासित असलेल्या हसीना यांच्याशी दूरध्वनीवर संवाद साधल्याची चर्चा समोर आली. त्यामुळे त्यांचा राजीनामा मागितला जात आहे, पण एखाद्या राष्ट्रप्रमुखाचा राजीनामा केवळ एका फोन कॉलमुळे मागितला जात असेल, तर लोकशाहीच्या दृष्टीने चिंतेचा विषय आहे. प्रत्यक्षात हा विषय विश्वासाचा आहे. राष्ट्रपती आपल्या राजकीय भूमिकेशी पूर्णपणे सुसंगत असावेत, अशी बांगलादेशमधील नव्या सत्ताधाऱ्यांची अपेक्षा आहे. मूळ प्रश्न असा आहे, की सत्तांतरानंतर जुन्या व्यवस्थेतील कोणालाही घटनात्मक पदावर ठेवायचे की नाही?

हे केवळ बांगलादेशपुरते मर्यादित नाही. पाकिस्तान, श्रीलंका, नेपाळ आणि अनेक विकसनशील लोकशाहींमध्ये सत्तांतरानंतर अशा प्रकारचे संस्थात्मक बदल पाहायला मिळाले आहेत; मात्र त्यातून संस्थांची स्वायत्तता अनेकदा कमकुवत झाली आहे. हसीना आज देशाबाहेर असल्या, तरी त्यांची राजकीय छाया अजूनही सरलेली नाही. सलग अनेक वर्षे सत्तेत राहिल्यामुळे त्यांनी मजबूत संघटनात्मक जाळे उभे केले. प्रशासनातील अनेक अधिकारी, स्थानिक नेतृत्व आणि अवामी लीगचे कार्यकर्ते अजूनही सक्रिय आहेत. त्यामुळेच हसीना डिसेंबरमध्ये परत येण्याची शक्यता व्यक्त होताच सरकारने सावध भूमिका घेतली आहे. राष्ट्रपतींसारख्या सर्वोच्च घटनात्मक पदावर अवामी लीगच्या काळातील व्यक्ती राहणे सरकारला धोकादायक वाटत असल्याचे दिसते. बांगलादेशमध्ये राष्ट्रपतींकडे भारताप्रमाणे मर्यादित अधिकार आहेत, तरीही संकटाच्या काळात घटनात्मक प्रक्रियेचे रक्षण करण्याची जबाबदारी त्यांच्यावर असते. सरकारच्या इच्छेनुसार राष्ट्रपती बदलले गेल्यास भविष्यात कोणत्याही घटनात्मक संस्थेची स्वायत्तता टिकेल का, असा प्रश्न उपस्थित होतो. बांगलादेशमधील सत्तारूढ 'बीएनपी' पक्षासमोर आज दोन मोठी आव्हाने आहेत. पहिले म्हणजे अवामी लीगचे पुनरुज्जीवन रोखणे आणि दुसरे म्हणजे स्वतःची राजकीय वैधता मजबूत करणे. यासाठी सरकार कठोर संदेश देत आहे. अवामी लीग, विद्यार्थी संघटना आणि संबंधित संस्थांवर कारवाई वाढवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. राष्ट्रपतींचा संभाव्य राजीनामाही या व्यापक रणनीतीचाच भाग असल्याचे अनेक विश्लेषक मानतात. सरकारला दाखवायचे आहे, की २०२४ पूर्वीची राजकीय व्यवस्था पूर्णपणे संपली असून नव्या बांगलादेशमध्ये जुन्या सत्ताकेंद्रांना स्थान नाही. दीर्घकाळ एकाच पक्षाच्या प्रभावाखाली राहिलेल्या संस्थांचे पुनर्गठन आवश्यक आहे. अन्यथा, नव्या सरकारला निष्पक्ष प्रशासन मिळणार नाही. भारतासाठी सर्वांत महत्त्वाचे म्हणजे बांगलादेशमध्ये घटनात्मक स्थैर्य टिकून राहणे.

शहाबुद्दीन यांनी राजीनामा दिला, तर सरकारच्या भूमिकेशी सुसंगत नवा राष्ट्रपती निवडला जाण्याची शक्यता आहे. त्यानंतर घटनात्मक संस्थांवरील नव्या सत्तेचा प्रभाव अधिक मजबूत होईल, मात्र यामुळे विरोधी पक्षांचे राजकारण अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. हसीना परत आल्यास किंवा 'अवामी लीग' पक्षाने नव्याने संघटन उभे केल्यास बांगलादेशमध्ये पुन्हा मोठा राजकीय संघर्ष उभा राहू शकतो. राष्ट्रपती मोहम्मद शहाबुद्दीन यांच्या संभाव्य राजीनाम्याचा अर्थ केवळ एका घटनात्मक पदाधिकाऱ्याची बदली असा नाही. लोकशाहीचा खरा कस सत्ताबदलात लागत नाही, तर सत्ताबदलानंतर विरोधकांशी आणि घटनात्मक संस्थांशी कसे वागले जाते, यात लागतो. प्रत्येक नवीन सरकारने जुनी व्यवस्था पूर्णपणे पुसून टाकण्याचा प्रयत्न केल्यास देशात स्थिर लोकशाही नव्हे, तर सततचा 'राजकीय सूडाचा चक्रव्यूह' निर्माण होईल. बांगलादेशसमोर आज नेमका हाच प्रश्न उभा आहे, नव्या युगाची सुरुवात संस्थांच्या बळकटीकरणाने होणार की संस्थांच्या राजकीय पुनर्बांधणीने? याचे उत्तरच त्या देशाच्या लोकशाहीचे भवितव्य निश्चित करेल. बांगलादेशचे राष्ट्रपती शहाबुद्दीन यांच्या राजीनाम्याची चर्चा वरकरणी केवळ घटनात्मक बदल वाटत असला, तरी त्यामागे देशातील सत्तासंघर्ष, हसीना यांचे राजकीय अस्तित्व, अवामी लीगचे पुनरुज्जीवन आणि नव्या सत्ताधाऱ्यांची असुरक्षितता अशी अनेक स्तरांची गुंतागुंत दडली आहे. त्यामुळे हा संभाव्य राजीनामा केवळ एका व्यक्तीच्या पदत्यागाचा प्रश्न नसून बांगलादेशच्या भविष्यातील राजकीय दिशेचा संकेत मानला जात आहे. मे महिन्यात उपचारासाठी लंडनला गेलेल्या शहाबुद्दीन यांनी भारतात निर्वासित जीवन जगत असलेल्या हसीना यांच्याशी दूरध्वनीवर संवाद साधला होता. नंतर ही माहिती बांगलादेशच्या गुप्तचर यंत्रणांना मिळाल्यानंतर राष्ट्रपतींनी पद सोडावे, असा अप्रत्यक्ष संदेश त्यांच्यापर्यंत पोहोचल्याचे सांगितले जात आहे. हसीना यांनी या वर्षी डिसेंबरमध्ये बांगलादेशमध्ये परत येऊन न्यायालयासमोर शरणागती पत्करण्याचा इरादा व्यक्त केल्यानंतर देशातील राजकीय समीकरणे आणखी संवेदनशील बनली आहेत. हसीना परतण्याची शक्यता नव्या सरकारसाठी मोठे आव्हान ठरू शकते. सुरक्षा यंत्रणांच्या माहितीनुसार, अवामी लीगचे काही नेते पक्षाचे पुन्हा संघटन करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे सरकार कोणतीही संभाव्य राजकीय चळवळ सुरुवातीलाच रोखण्याच्या भूमिकेत दिसत आहे.

बांगलादेशमध्ये राष्ट्रपती हे कार्यकारी अधिकारांच्या दृष्टीने मर्यादित भूमिका बजावतात, तरीही हे पद देशाच्या घटनात्मक सातत्याचे प्रतीक आहे. शहाबुद्दीन हे जुलै २०२४ पूर्वीच्या राजकीय व्यवस्थेतील एकमेव प्रमुख घटनात्मक पदाधिकारी आहेत. म्हणूनच नव्या सत्ताधाऱ्यांच्या दृष्टीने त्यांची उपस्थिती केवळ औपचारिक नसून प्रतीकात्मक आहे. जुनी व्यवस्था पूर्णपणे संपल्याचा संदेश देण्यासाठी राष्ट्रपती बदलणे आवश्यक असल्याचे सरकारमधील काही घटकांना वाटत आहे. तारिक रहमान यांच्या नेतृत्वाखालील नव्या सरकारने अवामी लीगविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. पक्षाशी संबंधित विविध संघटनांविरोधातील कारवाया अधिक तीव्र करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या पृष्ठभूमीवर राष्ट्रपतींचा संभाव्य राजीनामा हा सरकारचा कठोर राजकीय संदेश म्हणूनही पाहिला जात आहे. ■

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**नितीन शिरसाट**

# शक्तिवर्धक पेय; तरुणाईला धोका

आजचा तरुण वेगवान जीवनशैलीचा प्रतिनिधी आहे. स्पर्धा, करीअर, शिक्षण, पोलिस व सैन्य भरतीची तयारी, जिममधील शरीरसौष्ठव, रात्रभर अभ्यास, ऑनलाईन गेमिंग, सोशल मीडिया आणि सतत कार्यक्षम राहण्याची मानसिकता या सगळ्यांच्या छायेत एक नवीन संस्कृती झपाट्याने वाढत आहे. ती म्हणजे शक्तिवर्धक पेय संस्कृती. पूर्वी थकवा आला की दूध, ताक, लिंबूपाणी, नारळपाणी, उसाचा रस किंवा घरगुती पेये घेतली जात. आजही काही घरांमध्ये लहान मुलांपासून तरुणांपर्यंत हीच पेये दिली जातात. परंतु स्पर्धेत टिकण्यासाठी त्यांची जागा रंगीबेरंगी बॉटलमधील पेयांनी घेतली आहे आणि त्याची विक्री मोठ्या धडाक्यात होत आहे. महाविद्यालयीन तसेच स्पर्धा परीक्षा देणारा विद्यार्थी असो, व्यायामशाळेत जाणारा युवक, रात्री काम करणारा कर्मचारी, पोलिस भरतीची तयारी करणारा उमेदवार असो, अनेकांना वाटते की हे पेय म्हणजे यशाचे गुपित आहे. पण या क्षणिक ऊर्जेची किंमत शरीराला किती मोजावी लागते हा प्रश्न फारसा विचारात घेतला जात नाही. शक्तिवर्धक पेये ही केवळ पेये नाहीत ती अब्जावधी रुपयांची जागतिक उद्योगव्यवस्था आहे.

अनेकांना वाटते की शीतपेय आणि शक्तिवर्धक पेय सारखेच असतात. प्रत्यक्षात दोघांमध्ये महत्त्वाचा फरक आहे. शीतपेय मुख्यतः तहान भागवण्यासाठी किंवा चवीसाठी घेतले जाते तर शक्तिवर्धक पेयाचा उद्देश ऊर्जा वाढवणे किंवा सतर्कता यासाठी असतो. ही ऊर्जा प्रत्यक्ष अन्नातून मिळणारी ऊर्जा नसून केंद्रीय मज्जासंस्थेवर उत्तेजक परिणाम करणाऱ्या घटकांमुळे जाणवणारी तात्पुरती सतर्कता असते. अशा पेयांचा अतिरेक हा जोखीम वाढवणारा घटक ठरू शकतो. यामुळे सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने या विषयाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. ऊर्जा विकत मिळत नाही. ती संतुलित आहार, पुरेशी झोप, नियमित व्यायाम आणि शिस्तबद्ध जीवनशैलीतून मिळते. क्षणिक उत्साह हा कायमस्वरूपी आरोग्याची हमी देत नाही. उलट योग्य माहितीअभावी त्याचा अतिरेक तरुणाईला धोक्याच्या दिशेने नेऊ शकतो. पोटात गेल्यानंतर त्यातील कॅफिन काही वेळात रक्तात शोषले जाते. त्यानंतर ते मेंदूपर्यंत पोहोचून, थकवा किंवा झोपेची भावना निर्माण करणाऱ्या रसायनाच्या कार्यात अडथळा आणते.



यामुळे व्यक्तीला झोप येत नाही. उत्साह वाढल्यासारखा वाटतो. थकवा कमी झाल्याची भावना निर्माण होते. लक्ष केंद्रित झाल्यासारखे वाटते. मात्र याचा अर्थ शरीराला नवीन ऊर्जा मिळाली असा होत नाही. शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी थेट निगडित असलेल्या एका महत्त्वाच्या मुद्यावर राज्य सरकारने विधानसभेत ठोस भूमिका घेताना, शाळांच्या परिसरात विद्यार्थ्यांच्या आरोग्यास हानिकारक ठरणारे अन्नपदार्थ तसेच कॅफिनयुक्त पेये विकणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल अशी महत्त्वपूर्ण माहिती अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिली. शक्तिवर्धक पेयांवर शाळांच्या ५०० मीटर परिसरात विक्री करण्यास पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. भाजप आमदार विक्रम पाचपुते यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान दोन बॉटल थेट सभागृहात आणून हा अत्यंत गंभीर मुद्दा उपस्थित केला. शाळा परिसरामध्ये ज्याप्रमाणे अमली पदार्थाच्या विक्रीवर कायदेशीर निर्बंध लादले जातात त्याच धर्तीवर या पेयांच्या विक्रीवरही कडक बंदी घालण्यात येईल आणि त्याचे आवश्यक आदेश प्रशासनातर्फे तातडीने जारी केले जातील असे आश्वासन देखील मंत्र्यांनी यावेळी सभागृहात दिले.

अहिल्यानगर जिल्ह्यात शक्तिवर्धक पेयांच्या अतिसेवनामुळे हृदयाचे ठोके अचानक वाढून लहान मुलांचा मृत्यू झाल्याच्या दुर्दैवी घटना समोर आल्या. या पेयाच्या बॉटलवर लहान मुलांसाठी आणि गर्भवती महिलांसाठी हे पेय योग्य नाही असा स्पष्ट इशारा लिहिलेला असतो. तरीही शाळा-महाविद्यालयाच्या परिसरात याची विक्री होत असल्याचे आढळले आहे. पुण्यातील दौंड येथे पोलिस भरतीसाठी एका तरुणाने शक्तिवर्धक पेये प्राशन केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. जवानांच्या प्रसंगावधानाने त्याचे प्राण वाचले. भारताचे सर्व क्षेत्रात उज्ज्वल भविष्य घडविणाऱ्या तरुणांच्या या व्यसनाला कायमस्वरूपी बंदी घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने व शासनाने कठोर निर्णय घेणे आवश्यक झाले आहे. ■

९८८१७१७८२८

## इतस्ततः

# 'कामगार संघटना कायदा, १९२६'ची शतकपूर्ती

**दत्तात्रेय आंबुलकर**

ब्रिटिश राजवटीतील व तत्कालीन संदर्भातील प्रामुख्याने नमूद करण्यासारखे काही प्रमुख मुद्दे म्हणजे, त्यावेळच्या प्रचलित राष्ट्रीय-स्वातंत्र्य चळवळीचाच एक भाग म्हणून कामगार चळवळीची राष्ट्रीय संदर्भात पूरक अशी वाटचाल सुरू होती. स्वातंत्र्य चळवळी अंतर्गत स्वदेशीच्या राष्ट्रीय भावनेतूनच मुंबईच्या कापड गिरणीत हुतात्मा बाबू गेनूने बलिदान दिले होते. स्व. नारायण लोखंडे, ना. म. जोशी यांच्यासारखे प्रमुख कामगारनेते त्यावेळच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी पण अग्रणी होऊन लढा देत असत. याची नोंद अर्थातच ब्रिटिश सरकारपाशी होती.

याचेच प्रतिबिंब लंडनच्या गोलमेज परिषदेदरम्यान महात्मा गांधी यांच्या ब्रिटिश पत्रकारांशी झालेल्या चर्चेतून पण दिसून आले. अहमदाबादच्या गिरणी कामगारांचा यशस्वी लढा लढून महात्मा गांधी लंडनच्या गोलमेज परिषदेसाठी गेले होते. गोलमेज परिषदेदरम्यान गांधीजींना ब्रिटिश पत्रकारांनी शासन-प्रशासन व व्यवस्थापन यंत्रणेत कामगार संघटनांचे महत्त्व काय? असा प्रश्न विचारला होता. त्या प्रश्नाच्या उत्तरात म. गांधींनी दिलेले उत्तर म्हणजे, ''शासन-व्यवस्थापन या व्यवस्थेत कामगार संघटनेचे महत्त्व हे भोजनातील मिठासारखेच आहे. जेवताना जसे आपल्या अन्नात मीठ आवश्यक असते, तसेच महत्त्व व्यवस्थापन यंत्रणेत कामगार संघटनांचे आहे.'' महात्माजींच्या या उत्तराने त्यांचे स्वातंत्र्य आंदोलनाच्या दरम्यान पण कामगार आणि कामगार संघटना यांचे महत्त्व स्पष्ट तर आहेच. शिवाय, थेट लंडनहून ब्रिटिश सत्तेला नेमका संदेशपण मिळला, हे विशेष!

याचीच परिणती १९२६च्या कामगार संघटना कायद्यामध्ये होऊन, ब्रिटिशांनी भारतीय कामगार आणि कामगार संघटनांच्या संदर्भात महत्त्वपूर्ण दिशादर्शक कामगार कायद्याची निर्मिती करण्याचा राष्ट्रीय इतिहास घडून आला.

अशाप्रकारे १९२६ मध्ये करण्यात आलेला 'कामगार संघटना कायदा' हा देशांतर्गत औद्योगिक व कामगार क्षेत्रातील अग्रणी व पथदर्शी कायदा ठरला. याअंतर्गत व तत्कालीन स्वातंत्र्य चळवळीच्या पृष्ठभूमीवर कामगारांना औपचारिक संघटना स्वातंत्र्य प्रथमच प्रदान करण्यात आले. याचाच एक भाग म्हणून कामगार संघटना नोंदणी प्रक्रिया व त्याचे नियम निश्चित केले गेले व त्याचे दूरगामी परिणाम नंतरच्या काळात दिसून आले. याचाच पुढचा टप्पा म्हणून भारताच्या संविधानांतर्गत स्वतंत्र भारताचे नागरिक म्हणून देशातील कामगारांना संघटना स्वातंत्र्य मूलभूत अधिकार स्वरूपात प्राप्त झाले, हे लक्षणीय आहे.

१९२६च्या कामगार संघटना कायद्याच्या मूलभूत महत्त्वाच्या तरतुदींनुसार, कामगार संघटना म्हणजे कामगार आणि व्यवस्थापन यांच्या दरम्यान परस्परसंबंध प्रस्थापित करण्यासाठी कामगारांचा एकत्र आलेला समूह आहे. यामध्ये अशाच उद्देशाने कर्मचारी ते कर्मचारी व व्यवस्थापन ते व्यवस्थापन यांच्या दरम्यानच्या परस्परसंबंधांचा पण समावेश करण्यात आला आहे.

कामगार संघटनांची नोंदणी करण्यावर या कायद्यांमध्ये मुख्य भर असल्याने कामगार संघटनेची विशिष्ट उद्योग वा आस्थापनेत कामगार संघटना म्हणून नोंदणी करण्यासाठी कमीत कमी सहा कामगारांची सदस्यसंख्या आवश्यक असते. अशी नोंदणी करण्याचे काम व अधिकार कामगार संघटना निबंधक यांना असतात. संबंधित कामगार संघटनेच्या सदस्यांनी आवश्यक सदस्यता शुल्क भरून सुरुवातीची नोंदणी करून त्याचे नवीकरण करणे आवश्यक असते. अशाप्रकारे पंजीकृत कामगार संघटनांना विशिष्ट आस्थापनेच्या संदर्भात पंजीकृतपत्र संबंधित राज्याच्या कामगार संघटना निबंधकांतर्फे प्रदान केले जाते.

अशाप्रकारे 'कामगार संघटना कायदा १९२६' अंतर्गत अंतर्गत पंजीकृत कामगार संघटनेला कायदेशीररीत्या संस्था म्हणून कामगार संघटनेचे नाव वापरता येते. संघटनेच्या वतीने पत्रव्यवहार करता येतो व कामगारांचे प्रश्न व समस्या मांडता येतात, सदस्यांकडून सदस्यता व नवीकरण शुल्क घेता येते व कामगार संघटनेच्या वतीने आवश्यक ते आर्थिक व बँकिंगविषयक व्यवहार केले जातात. पंजीकृत कामगार संघटनेचे पदाधिकारी स्वरूपात केलेल्या कारवाई वा कृत्यांच्या संदर्भात कुठल्याही दिवाणी वा फौजदारी न्यायालयात कारवाई करता येत नाही.

कामगार संघटना नोंदणी कायद्यांतर्गतच्या नियमांनुसार, कामगार संघटना निबंधकांचे पद, जबाबदारी आणि अधिकार फार महत्त्वाचे ठरतात. कामगार संघटना निबंधकांच्या अधिकार क्षेत्रात प्रामुख्याने कामगार संघटनांचे पदाधिकारीपद, प्रसंगी उद्भवणारे अंतर्गत विवाद, गरजेनुसार सदस्यत्वाची तपासणी व पडताळणी, संबंधित आस्थापना- व्यवस्थापनाचे म्हणणे व मुद्दे, आवश्यकतेनुसार चौकशी, कायद्याच्या अंमलबजावणीची खातरजमा व त्यानुरूप कामगार संघटनेची नोंदणी वा पंजीकरण, त्याचे नवीकरण व विशिष्ट परिस्थितीत पंजीकृत कामगार संघटनेचे पंजीकरण रद्द करणे इ. जबाबदारीच्या कामांचा प्रामुख्याने समावेश असतो. कामगार संघटना निबंधकांच्या निर्णयाला तथ्य व परिस्थितीनुरूप कामगार वा औद्योगिक न्यायालयात आव्हान दिले जाऊ शकते. अशाप्रकारचे न्यायालयीन निर्णय सर्व संबंधितांना बंधनकारक असतात.

१९२६च्या कामगार संघटना कायद्यानंतर स्वातंत्र्य आंदोलनाच्या जोडीलाच कामगार चळवळीने पण विविध स्वरूपात आंदोलनात्मक टप्पे पाहिले. मात्र, प्रत्यक्षात उद्योग व कामगार क्षेत्रात व विशेषतः औद्योगिक संबंध क्षेत्रातील नवे कामगार कायदे व नियम स्वातंत्र्योत्तर काळातच करण्यात आले, ही वस्तुस्थिती आहे.

यासंदर्भात 'मुंबई औद्योगिक संबंध कायदा', केंद्रीय स्तरावरील औद्योगिक संबंध कायदा व त्याअंतर्गतचे व्यापक नियम, राज्य स्तरावरील 'महाराष्ट्र कामगार संघटना मान्यता व अनुचित प्रथा निर्मूलन कायदा' या प्रमुख कायद्यांचा समावेश करता येतो. या आणि अशाप्रकारच्या कामगार संघटनांच्या माध्यमातून उद्योग आणि औद्योगिक संबंध क्षेत्राला दिशानिर्देश देण्याचे काम वेळोवेळी केले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात करण्यात आलेल्या या नव्या कामगार कायदे व नियमांची पडताळणी आणि अंमलबजावणी यामुळे व्यवसाय क्षेत्र-उद्योग व्यवस्थापन एवढेच नव्हे, तर औद्योगिक संबंध क्षेत्राला दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण काम झाले. या कायद्यांतर्गतच्या न्यायालयीन निवाड्यांमुळे कायद्यांतर्गत व्यवस्था पण निर्माण झालेली आहे. एवढेच नव्हे, तर कामगार संघटना कायदा व त्यातील तरतुदींमुळे स्वांतत्र्यपूर्व काळापासून व गेल्या शतकामध्ये देशांतर्गत स्थानिक, राज्य व प्रसंगी राष्ट्रीय स्तरावरील कामगारांचे, कामगारांमधून आलेले व कामगारांसाठी सातत्याने काम करणारे नेतृत्व निर्माण केले, हे या कायद्याचे योगदान अनेकार्थांनी महत्त्वपूर्ण व म्हणूनच कायमस्वरूपी प्रासंगिक ठरते. ■

(लेखक एचआर व्यवस्थापक आणि सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### गुरूचे महत्त्व

गुरुपौर्णिमा हा आषाढ शुद्ध पौर्णिमेला साजरा होणारा एक महत्वाचा सण आहे. ज्यामध्ये महर्षी वेद व्यास यांच्या जन्मोत्सवानिमित्त व आपल्या आयुष्यातील सर्व गुरूंप्रति कृतज्ञता व्यक्त केली जाते. आपल्या जीवनात गुरूचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. गुरू आपल्याला योग्य आणि अयोग्य यातील फरक शिकवतात. संकटांवर मात करण्याचे सामर्थ्य आणि आत्मिक शांतता मिळवण्यासाठी गुरूंचे मार्गदर्शन आवश्यक असते. गुरुपौर्णिमेला 'गुरुपूजन' करण्याची पद्धत आहे. चारही वेदांवर पहिल्यांदा भाष्य करणाऱ्या व्यास ऋषींची या दिवशी पूजा केली जाते. व्यासांनीच लोकांना वेदाचे ज्ञान दिले. ते आपले आद्यगुरू आहेत. हिंदू संस्कृतीने गुरूंना ईश्वरापेक्षाही उच्च स्थान दिले आहे, कारण गुरू साधकाला ईश्वरप्राप्तीसाठी आध्यात्मिक साधना शिकवतात, ती त्याच्याकडून करून घेतात आणि त्याला ईश्वरप्राप्तीसाठी मदत करतात. गुरू अनेक जन्मांमध्ये शिष्यांना विविध प्रकारे मार्गदर्शन करतात.

**शंकर कुळकर्णी**/९७६४४६५५७०

### गुरू अनेक, पण गुरुतत्त्व एकच

अध्यात्मात ईश्वरप्राप्ती करायची असेल तर गुरूंशिवाय पर्याय नाही. आपण कोणाला गुरू करण्यापेक्षा गुरूंनी आपल्याला शिष्य म्हणून स्वीकारावे एवढी पात्रता आपल्या अंगी असावी लागते. ईश्वर आणि गुरू एकच आहेत. गुरू म्हणजे ईश्वराचे सगुण रूप आणि ईश्वर म्हणजे गुरूंचे निर्गुण रूप. समाजातील बरेच लोक गुरुपौर्णिमा साजरी करतात. सर्वच आपापल्या गुरूंविषयी कृतज्ञता भावाने त्यांना शरण जाऊन त्यांची पूजा अर्चना करतात. परंतु हे करीत असताना गुरुतत्त्वाचे मूळ रूप लक्षात न घेता सगळ्या कृती घडत असतात. काही लोक स्वामी समर्थ महाराजांना, तर काही साईबाबांना, कोणी गोंदवलेकर महाराजांना, तर कोणी प्रल्हाद महाराजांना गुरु मानतात, तर काही भक्तराज महाराजांची भक्ती करतात.



## वाचक पत्रे

म्हणजे प्रत्येकच जण आमचे हे गुरू आहेत असे सांगत असतात. परंतु या सगळ्या संतांनी गुरुतत्त्व एकच आहे हीच शिकवण दिली.

एकदा एक भक्त गजानन महाराजांना विचारतो, ''माझा खरा गुरू कोण?''

त्यावर महाराज म्हणाले - ''गुरू शोधायचा नाही, तो जाणायचा असतो. तो तुझ्या अंतःकरणात आहे. ज्याच्या शब्दांत ब्रह्मज्ञान आहे, तोच खरा गुरू!''

एका भक्ताने अक्कलकोट स्वामी समर्थांना विचारले - ''स्वामी, मी अनेक गुरू शोधले, कुणावर श्रद्धा ठेवावी हेच कळेना.''

त्यावर स्वामी समर्थ म्हणाले - ''ज्याच्याजवळ श्रद्धा ठेवलीस, त्याच्यात मीच होतो.''

श्रीरामकृष्ण परमहंस यांनी स्वामी विवेकानंद यांच्याकडे पाहून स्पष्टपणे म्हटलं - ''हे माझे काम पुढे नेणारे व्यक्तिमत्त्व आहे. माझं तत्त्व याच्यामध्ये कार्य करेल.'' यातून स्पष्ट होते की, देह बदलतात, पण त्यांचे तत्त्व म्हणजे ईश्वरी कार्य करणारी ऊर्जा तीच असते. गुरू तत्त्व देहाच्या पलीकडचे आहे आणि ते कालातीत व सर्वव्यापक तत्त्व आहे. जसे पाण्याच्या टाकीला लहान मोठ्या बऱ्याच तोट्या असल्या, तरी प्रत्येक तोटीतून टाकीतीलच पाणी येते. त्याचप्रमाणे कोणत्याही देहधारी किंवा परब्रह्म गुरूंची उपासना केली, तरी त्यांच्यातील गुरुतत्त्व म्हणजे ईश्वरी तत्त्व एकच असते. हे लक्षात घेऊन सगळ्यांकडे सम भावाने बघून साधना केल्यास आध्यात्मिक प्रगती लवकर होते.

**माधवी पत्की**/नागपूर

■■■

### क्रांतिवीर चापेकर पुलाची दुरवस्था

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या बिजलीनगरातील क्रांतिवीर चापेकर पुलाची कचऱ्याच्या साचण्याने दुरवस्था झाली आहे. बिजलीनगर चिंचवड या पुलावरील फूटपाथवर कचऱ्याचे ढीग पडलेले असून पूर्ण फूटपाथ कचऱ्यानेच वेढून गेला आहे. परिणामी पायी



चालणाऱ्यांना दुर्गंधीचा सामना करीत जावे लागत आहे. कचरा टाकणाऱ्यांनी आता फूटपाथही सोडले नसल्याचे हे उत्तम उदाहरण आहे. पायी चालणाऱ्यांनी चालायचे तरी कसे असा प्रश्न परिसरातील नागरिक विचारत आहेत. संबंधित प्रशासनाने याची तातडीने दखल घेणे गरजेचे असून कचरा टाकणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची करण्याची येथील ज्येष्ठ नागरिकांद्वारे करण्यात आली आहे. ■

**देविदास पाठक**/चिंचवड, पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# छत्रपती संभाजीनगर

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com


# अन्नछत्राची स्थापना जनमेजयराजे यांच्या कार्याची इतिहासात सुवर्णाक्षरांनी होणार नोंद









जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले










- मंडळाच्या उभारणीत प्रारंभी एसटी महामंडळाचे कर्मचारी प्रत्येक महिन्याला स्वामीसेवा म्हणून मोठे योगदान दिले हे योगदान फार मोलाचे आहे . या योगदानाची कायम आठवण रहावी व यातुन उतराई होण्यासाठी मंडळाने एसटी साठी वाहन तळ कर्मचाऱ्यांना विश्राम कक्ष स्थापन केले.
- लातुर किल्लारी भुकंपात सर्वप्रथम १ महिना भर टुकभर शिजवलेले अन्न भोजन पुरवठा केला
- अक्कलकोट शहराच्या सोंदर्यात भर घालण्या साठी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा सिंहाचा वाटा आहे. अनेक चौक व रस्त्यानां नामफलक सुशोभीरण केले आहे.
- राजे फत्तेसिंह चौक येथे भाविकांच्या स्वागतासाठी भव्य स्वागत कमान उभारली आहे यामुळे शहराच्या सौंदर्यात मोठी भर पडली आहे .
- राजे फत्तेसिंह क्रिंडागणावर वृक्षलागवड संरक्षक भिंतीवर पर्यावरण संरक्षणाचे संदेश व बसण्यासाठी आसन व्यवस्था केली .
- अक्कलकोटवासीय व भाविकासाठी रुग्णवाहिकेची सोय केली आहे .
- श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या वतीने शहरात तालुक्यात आग लागल्यास अग्निशमन वाहन तात्काळ तेथे सेवे देते .
- स्वामीभक्ताना दर्शनासाठी तुळजापुरला जाता नाही आले तर अन्नछत्र मंडळात अंत्यत देखणे आई तुळजा भवानी मातेचे मंदिर उभे करून भाविकांची आई जगदंबेच्या दर्शनाची आस पुर्ण व्हावी या हेतुने मंदिर उभे केले आहे .
- छत्रपती शिवरायांचे गडकिल्ले शिव स्मारक अजरामर धातुशिल्प शिवचरित्र दालन ' वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरी ची साक्ष देणारे बालोद्यान रोपवाटिका ' भव्य स्वागत कमान जगदंबेचे मंदिर आदिची निर्मीती करून इतिहास घडविला.

नंदकुमार जगदाळे

**अक्कलकोट :** एक आदर्श धर्मादाय संस्था न्यास कसे असावे याचा मापदंड श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे भोसले यांनी घालून दिला आहे . श्री स्वामी समर्थ महाराजांच्या लिला कार्याने पावन झालेली अक्कलकोट तीर्थक्षेत्र भुमी धार्मीक पर्यटनामुळे संपूर्ण जगात नावारूपास आली . तीर्थक्षेत्र अक्कलकोटमध्ये दररोज हजारो भाविकानां व उत्सव काळात लाखो भाविकाना मोफत महाप्रसाद अन्नदान सेवेचा पाया संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे भोसले यांनी रचला . तर गरीब आनाथ व्याधीग्रस्तानं घरपोच जेवण हा उपक्रम श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी चालु करून यावर कळस चढविण्याचे कार्य केले आहे .ज्ञानदेव रचिला पाया तुका झालासे कळस ही उक्तीची आठवण यामुळे होते . . संस्थापक अध्यक्ष जनमेयजयराजे भोसले यांच्या कार्याबद्दल स्वर्गीय गान कोकीळा लता मंगेशकर छत्रपती शिवाजी महाराज चरित्राचे ख्यातनाम व्याख्याते प्रा नितीन बानगुडे पाटील राष्ट्रीय प्रबोधनकार किर्तनकार इंदोरीकर महाराज यांनी गौरवोद्गार काढले आहेत . यामुळे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ धार्मिक सामाजिक वैदयकीय पर्यावरण विषयक शैक्षणिक क्रीडाविषयक राष्ट्र जडणघडणीत जे उपक्रम राबवित आहे याची अक्कलकोटच्या इतिहासातच नव्हे तर भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी ऐत्यासिक नोंद होईल यात तिळमात्र शंका नाही . श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाची स्थापना करून संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे भोसले यांनी एक इतिहास रचला आहे . ध्येयप्राप्ती होण्यासाठी त्या कामाप्रती झोकून द्यावे लागते त्या कार्यासाठी वेडे व्हावे लागते आणि ध्येयवेडया माणसा कडूनच इतिहास घडविला जातो . असाच इतिहास रचला संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे भोसले यांनी ... आज अन्नछत्र मंडळाची ख्याती जगात साता समुद्रा पार गेली आहे . अचानकआपल्या घरात दोन माणस पाहुणे जास्त आली तर तारांबळ उडते येथे रोज लाखो भाविक महाप्रसाद घेऊन तृप्त होतात.!

जे का रंजले गांजले ।
तोसी म्हणे जो आपुले ।
देव तेथेची जाणावा !

महाराष्ट्र ही संताची भुमी येथे अनेक साधु संत महात्मे होऊनी गेले . आज आपण संताच्या आचार विचार अनुकरणाने त्या मार्गावर जाण्याचा प्रयत्न करत आहोत . असेच संताच्या अनेक विचारान आचारान भारलेले वेळप्रसंगी नाठाळाशी मारू काठी प्रसंगी एखाद्या च्या मदतीसाठी धाऊन जाणारे पाठीशी खंबीरणे उभे राहणारे जनमेजयराजे भोसले १९८८ साली अंत्यत प्रतिकुल परिस्थितीमध्ये आपल्या घरदार कुटुंबाकडे दुर्लक्ष करीत ध्येय वेड्यासारखे झपाटल्यागत कष्ठ सोसले .स्वामी भक्ताना मोफत महाप्रसाद भोजन मिळावे या उद्देशाने अवघ्या तीन किलो तांदळावर अंत्यंत दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर अन्नदान महाप्रसाद सेवा सुरु केली . त्यांचे ध्येय उदात्त अंत्यत कल्याणकारी होते अन. साक्षात श्री स्वामी समर्थच अन्नछत्र मंडळाच्या पाठीशी उभे राहिले ! . स्वामी भक्तानां मोफत महाप्रसाद मिळावा हा उदात्त हेतु सफल झाला . . आज श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात रोज हजारो भक्तानां उत्सव काळात लाखो भक्तानां सळाळी संध्याकाळी दोन्ही वेळेस मोफत महाप्रसाद दिला जातो .मोफत महाप्रसाद देण्याच्या कार्याचा प्रारंभ पाया रचण्याचे काम संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे भोसले यांनी केल . तर यावर कळस चढविला ते श्रीस्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी . जे कोणी एखाद्या व्याधीने रंजले आहेत गांजले आहेत अनाथ आहेत . उदरनिर्वाह करू शकत नाहीत अशांना मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी आपलेस केल . त्यांना दया दाखविली . स्वामी भक्ताना देण्यात येणारा महाप्रसाद भोजन हेच भोजन रोज डब्यामध्ये अंत्यत गरीब गरजुनां अनाथांना घरपोच दिला जातो तीर्थक्षेत्र अक्कलकोटमध्ये कोणी गरीब अनाथ उपाशी राहु नये याची दक्षता श्री स्वामी समर्थ मंडळाचे मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी घेतली आहे . म्हूणून म्हणावेसे वाटते की जे का रंजले गांजले । तोसी म्हणे आपुले देव तेथेची जाणावा ! आपल्या घरी अचानक पाहुणे आले तर त्याची व्यवस्था करताना आपली . फारच तारांबळ होते स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात रोजच स्वामी भक्त येतात . या साऱ्यांची मोफत महाप्रसाद सेवेची सोय करणे म्हणजे हा स्वामी समर्थाचा चमत्कारच आहे . हजारो नव्हे तर उत्सव काळात लाखो स्वामी भक्तांना कुठल्याही प्रकारची कमतरता न भासवता हे अन्नदाना चा मोठा यज्ञ चालु आहे . याकरिता मोठी दानतही लाकते उदारताही लागते स्वामी भक्त उदार हातानी देतात . हे सर्व करून आणण्याची मानसिकता हवी . जगात अब्जोधिश लोक आहेत पण दानत साऱ्याकडेच आहे असे होत नाही . मोठी दानतही असावी लागते ही मोठी दानतही श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे यांच्या जवळ आहे . श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ न्यास राष्ट्र उभारणीत जडण घडणीत मोठे योगदान देत आहे . युवा पिढी बलवान तर राष्ट्र बलवान होईल ही उक्ती प्रमाणे मंडळाने युवकासाठी बंदिस्त जिम उभारले खुले जिमही उभारले आहे एवढेच नव्हे तर सृदृढ राष्ट्र निर्मीतीसाठी युवक सुदृढ बनविण्यासाठी पुढाकार घेतला . तालुक्यतील कुस्तीगिराना खुराक देऊन सुदृढ केले या कुस्तीगिरामध्ये स्पर्धा घेतली . प्राविण्य मिळविलेल्या कुस्तीगिराना स्पर्धेमध्ये नैपुण्यासाठी प्रोत्साहन दिले . पोशख खुराक मध्ये सातत्य ठेवले . कुस्तीगिरासाठी विशेष लक्ष देऊन युवा पिढी याकडे आकर्षित होण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे कार्य मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी निरंतर कायम ठेवले आहे . या कुस्तीगिरांचे पालकत्वच मंडळाने घेऊन महाराष्ट्रातील लोप पावत असलेला खरा मैदानी खेळ कुस्ती जिंवत ठेवण्याच कार्य अमोलराजे भोसले यांनी केल आहे . . कोवीड काळात श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाने केलेल्या कार्याला तोडच नाही . मंडळाने कोवीड काळात सर्व इमारती कोवीड सेंटरला दिल्या . अंत्यत गरजुना मंडळाने शिजवलेले जेवणाचे अन्न व शिधा ही पुरविले . जीवनावश्यक वस्तूचे किट वाटपही केले .

## कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांचे शिवचरित्र व्याख्याते प्रा. नितीन बानगुडे पाटील यांचे कडून कौतुक

ज्या समाजात पाठीवर कौतुकाची थाप मारणारे असतात तो समाज क्रांती करतो . स्वामी समर्थअन्नछत्र मंडळा कडून येथे जे यशस्वी विद्यार्थी गुणीजनांचा आदर्श व्यक्ती चा गौरव केला जातो कौतुकाची थाप मारली जाते हे फार मोठ प्रेरणादायी कार्य स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या कडून केल जात आहे साऱ्याच्या वर कौतुकाची थाप मारणारे अमोलराजे भोसले यांचे कार्य मोठे प्रेरणादायी असल्याचे गौरवोदगार प्रा नितीन बानगुडे पाटील यांनी यावेळी काढले .

## प्रसिद्ध राष्ट्रीय समाज प्रबोधन किर्तनकार हभप इंदोरीकर महाराज यांच्या कडून भोसले कुटूबांचे कौतुक

स्वामी समर्थाच्या कृपेमुळे हे अन्नदान धर्मसंकीर्तन चालू आहे जगात फक्त अक्कलकोट मध्येच अन्नदान मोठ्या प्रमाणात चालू आहे भोसले परिवार जोपर्यंत स्वामीची सेवा करतील तोपर्यंत अक्कलकोट परिसराला कायच कमतरता भासणार नाही असे गौरवोद्गार राष्ट्रीय कीर्तनकार प्रबोधनकार हभप इंदोरीकर महाराज यांनी कीर्तनसेवा प्रसंगी काढले आहेत .

## बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले

स्वर्गीय गान कोकीळा लता मंगेशकर कुटुंबियांचे जनमेजयराजे भोसले यांचे यांच्याशी अंत्यत स्नेहाचे संबंध स्वर्गीय लता मंगेशकर यांनी जनमेजयराजे भोसले यानां हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे दिव्य स्मारक उभे करावे असे सुचविले. लता दिदीचा हा आदेश मानून जनमेजयराजे भोसले यांनी अन्नछत्र मंडळात छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य गड किल्ले शिवस्मारक उभे केले . छत्रपती शिवाजी महाराजांचे अजरामर धातु शिल्प शिव चरित्र प्रसंगाचे दालन उभे केले आहे. स्व लता दिदीनां जो शब्द दिला होता तो शब्द जनमेजयराजे भोसले यांनी पाळला. म्हणून जनमेजयराजे भोसले यांच्या बाबत ठामपणे म्हणावेसे वाटते की बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले .

# देवगिरी बँकेला ४१ कोटींचा नफा; राजस्थानात शाखाविस्ताराची घोषणा - अध्यक्ष किशोर शितोळे

## 43 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत 12 टक्के लाभांशाला मंजुरी; इंटरनेट बँकिंग सेवेसह राष्ट्रीय विस्ताराकडे बँकेची वाटचाल

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** सातत्यपूर्ण आर्थिक प्रगतीचा आलेख कायम राखत देवगिरी नागरी सहकारी बँक लि.ने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ४१ कोटी रुपयांचा निव्वळ नफा मिळविला असून, राजस्थानातील सीकर जिल्ह्यात नवीन शाखा सुरू करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याची घोषणा बँकेचे अध्यक्ष किशोरदादा शितोळे यांनी केली. बँकेच्या ४३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांनी सर्व ठरावांना एकमताने मंजुरी देत १२ टक्के लाभांश वाटपासही हिरवा कंदील दिला.

दि. २६ जुलै रोजी उत्साहपूर्ण वातावरणात झालेल्या सभेत अध्यक्ष किशोर शितोळे यांनी पॉवर पॉइंट सादरीकरणाद्वारे बँकेच्या आर्थिक कामगिरीचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी बँकेला प्राप्त झालेला शेड्युल्ड बँकेचा दर्जा, सुरू करण्यात आलेली इंटरनेट बँकिंग सेवा आणि सातत्याने वाढणारा व्यवसाय यामुळे देवगिरी बँक अधिक सक्षम झाल्याचे त्यांनी सांगितले.

सभेच्या प्रारंभी बँकेचे सभासद व कर्मचारी यांच्या दहावी-बारावी परीक्षेत विशेष प्राविण्य मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला.




सभेत संचालक मंडळाने मांडलेल्या सर्व ठरावांना सभासदांनी सर्वानुमते मंजुरी दिली. त्यामध्ये १२ टक्के लाभांश वाटपाचा ठराव मंजूर करण्यात आला असून, लाभांशाची रक्कम सभासदांच्या खात्यात तत्काळ जमा करण्यात आली.

यावेळी राज्याचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे, माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड, महापौर समीर राजूरकर, स्थायी समितीचे सभापती अनिल मकरीये, सभागृह नेते गोविंद केंद्रे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, बँकेचे आजी-माजी संचालक, अधिकारी, कर्मचारी आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी किशोर शितोळे यांनी बँकेच्या व्यवसायवाढीबरोबरच आधुनिक बँकिंग सुविधा, डिजिटल सेवा आणि सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. राजस्थानातील सीकर येथे नवीन शाखा सुरू झाल्यानंतर महाराष्ट्रालगतच्या इतर राज्यांमध्येही शाखाविस्तार करण्याचा बँकेचा मानस असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सभासदांनी विविध विषयांवर सूचना व प्रश्न उपस्थित केले. त्यांना अध्यक्ष किशोर शितोळे, ज्येष्ठ संचालक शिवाजीराव शेरकर, अशोक पाटील, प्रशांत देशपांडे आणि ॲड. मुकेश गोयंका यांनी सविस्तर उत्तरे दिली. सभासदांनीही बँकेच्या भावी विकासासाठी विधायक सूचना मांडल्या.

सभेचे सूत्रसंचालन मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण नांदेडकर यांनी केले. उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्ता शिंदे यांनी मागील सभेच्या कार्यवृत्ताचे वाचन केले, तर उपमुख्य कार्यकारी अधिकारी रुपेंद्र कोयाळकर यांनी आभार मानले.

## उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय,व नाहादी पेट्रोल पंपासमोर रमलर थर्मा प्लास्टिकचे गतिरोधक

तभा वृत्तसेवा

**गंगापूर दि.२८:** येथील उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय व नाहादी पेट्रोल पंप समोर रमलर थर्मा प्लास्टिक चे गतिरोधक बसविण्यात आले. उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.निलेश पालवे व सामाजिक कार्यकर्ते सादेक शेख यांच्या पुढाकाराने याठिकाणी गतिरोधक बसविण्यात आले.



ग्रामीण भागातून पेट्रोल डिझेल भरण्यासाठी आलेले नागरिक नाहादी पंपाकडे वळण घेत असताना समोरून अवजड वाहने भरधाव वेगाने यायचे यामुळे येथे मोठ्या प्रमाणात अपघाताची मालिका सुरू झाली होती. सामाजिक कार्यकर्ते सादेक शेख यांनी अपघाताची मालिका थांबवावी यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. निलेश पालवे यांच्या पत्रासहित पाठपुरावा केला होता. त्यामुळे या ठिकाणी जागतिक बँक सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप- अभियंता शेख अब्दुल वहिद व कनिष्ठ अभियंता संतोष (झाल्टे)चाटूपले यांनी मागणीची विशेष दखल घेऊन रमलर थर्मा प्लास्टिक चे गतिरोधक बसवून दिले. यामुळे नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या 56व्या वाढदिवसानिमित्त ‘लाडक्या बहिणींचा’ 56 हजार वृक्षलागवडीचा संकल्प

## आ. संजय केणेकर यांच्या ‘संकल्प हरित महाराष्ट्राचा’ उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ५६व्या वाढदिवसानिमित्त ‘देवा भाऊंच्या लाडक्या बहिणीं’नी ५६ हजार वृक्षलागवडीचा संकल्प केला असून, या महत्त्वाकांक्षी उपक्रमाची सुरुवात सोमवारी छत्रपती संभाजीनगर येथे १० हजार वृक्षांचे वृक्षारोपण करून करण्यात आली. महिला भगिनींच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हरित अभियानाला मोठा प्रतिसाद मिळाला.



'देवेंद्रजी जन्मोत्सव – हरित महोत्सव' तसेच 'हरित महाराष्ट्र सप्ताह' अंतर्गत मराठवाडाभर ५ लाख वृक्षलागवडीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. माजी आमदार तथा देवा सेवा ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष संजय केणेकर यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या 'संकल्प हरित महाराष्ट्राचा... सहभाग प्रत्येक जनमानसाचा!' या अभियानाला जनतेचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. त्याच अभियानाचा भाग म्हणून 'देवा भाऊंच्या लाडक्या बहिणीं'नी ५६ हजार वृक्षलागवडीचा संकल्प जाहीर केला.

देवळाई वनक्षेत्रातील निसर्ग हॉटेलसमोर, धुळे–सोलापूर महामार्ग परिसरात झालेल्या वृक्षारोपण कार्यक्रमात १० हजार वृक्षांची लागवड करण्यात आली. या माध्यमातून ५६ हजार वृक्षलागवडीच्या संकल्पाची पहिली पायरी पूर्ण झाली असून उर्वरित वृक्षलागवड टप्प्याटप्प्याने पूर्ण केली जाणार आहे.

या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येक नागरिकाने वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन केले. भावी पिढ्यांसाठी हिरवा, स्वच्छ आणि समृद्ध महाराष्ट्र घडविण्याचा संदेश या अभियानातून देण्यात आला.

कार्यक्रमास भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेश सचिव गंगाताई ताठे, प्रदेश महिला मोर्चा सचिव तथा नगरसेविका अमृताताई पालोदकर, महामंत्री तथा नगरसेवक हर्षवर्धन कराड, उपवनसंरक्षक सुवर्णा माने, विभागीय वन अधिकारी संदीप गिरी, वन अधिकारी चव्हाण मॅडम, वन अधिकारी सागर कुटे, आशाताई कटके, दिव्या पाटील, मीनाताई मिसाळ, कमलेश जैन, गणेश डोंगरे यांच्यासह भाजपा पदाधिकारी, महिला कार्यकर्त्या आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. 2025/मशाका/जमाबंदी- १/जन्म-मृत्यु नोंद/ सिआर-207

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

दिनांक 17-06-2026

अर्जदार ०:- महंमद रफीक महंमद नुर शेख रा. कन्नड ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार ०:- नगर परिषद कार्यालय कन्नड ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ/ ॲड. मार्फत / स्वतः अर्ज सादर करून अर्जदार यांच्या स्वतःचे जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा स्वतः महंमद रफीक महंमद नुर शेख चा जन्म दिनांक 12-08-1965 रोजी कन्नड ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या स्वतः चा जन्म दिनांक 12-08-1965 रोजी कन्नड ता. कन्नड / ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म/मृत्यू प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाब्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा स्वतः महंमद रफीक महंमद नूर शेख यांचा जन्म दिनांक 12-08-1965 रोजी कन्नड ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/ आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक 29-07-2026 रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक 12-08-1965 रोजी कन्नड ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक ......./06/2026 रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## संक्षिप्त वृत्त...

### रत्नापुर शिवारातून १४.६४ लाखांचा एमडी ड्रग्सचा साठा जप्त; दोघांना अटक : स्थानिक गुन्हे शाखा व मानवत पोलिसांची मोठी कारवाई; दुचाकीसह अमली पदार्थ जप्त

**परभणी,/प्रतिनिधी :** अमली पदार्थांविरोधातील विशेष मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखा व मानवत पोलिसांनी तालुक्यातील रत्नापुर शिवारात धाड टाकून तब्बल १४ लाख ६४ हजार ४०० रुपये किमतीचा प्रतिबंधित एमडी (मेफेड्रोन) अमली पदार्थ जप्त केला. या कारवाईत दोन संशयितांना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरुद्ध मानवत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी (दि. २७) पहाटे सुमारे १.४० वाजण्याच्या सुमारास मानवत-पाथरी राष्ट्रीय महामार्गावरील रत्नापुर शिवारात मारोती मंदिरासमोर ही कारवाई करण्यात आली. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून अलीम शेख खाजा (रा. नायरा पेट्रोल पंपाजवळ पाथरी) व शाहरुख फिरोजखान पठाण (रा. रविववार पेठ, अंबाजोगाई) या दोघांना ताब्यात घेतले. झडतीदरम्यान अलीम शेख याच्याकडून ५२ ग्रॅम ३८ मिलिग्रॅम एमडी हा अमली पदार्थ जप्त करण्यात आला. त्याची किंमत १० लाख ४७ हजार ६०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. तर शाहरुख पठाण याच्याकडून २० ग्रॅम ८४ मिलिग्रॅम एमडी जप्त करण्यात आला असून त्याची किंमत ४ लाख १६ हजार ८०० रुपये असल्याचे आढळून आले. याशिवाय एमएच-१२-ईएम-९१३७ क्रमांकाची दुचाकीही जप्त करण्यात आली. सपोनि शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली या गुन्ह्याचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक खिल्लारे करीत आहेत.

### डॉ. तरल पाटील यांचे न्यूरो-रेडिओलॉजी फेलोशिप यशस्वीरीत्या पूर्ण; मुंबईतील नानावटी मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये घेतले विशेष प्रशिक्षण; न्यूरो-इमेजिंग क्षेत्रातील कौशल्यात भर : सर्वत्र अभिनंदन

**परभणी,/प्रतिनिधी :** वैद्यकीय क्षेत्रात आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठत डॉ. तरल पाटील यांनी मुंबई येथील प्रतिष्ठित नानावटी मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये न्यूरो-रेडिओलॉजी विषयातील फेलोशिप यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल वैद्यकीय क्षेत्र, सहकारी डॉक्टर, कुटुंबीय आणि मित्रपरिवारातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. परभणी येथील डॉ. प्रफुल्ल पाटील मल्टिसुपरस्पेशालिटी हॉस्पिटलचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रफुल्ल पाटील आणि संस्थापक सचिव विद्या पाटील यांच्या कन्या असलेल्या डॉ. तरल पाटील यांनी एमबीबीएस, एमडी (रेडिओ डायग्नोसिस) तसेच एफआरसीआर पार्ट-१ ही शैक्षणिक पात्रता प्राप्त केल्यानंतर न्यूरो-रेडिओलॉजी या अत्यंत विशेष शाखेत प्रा. डॉ. दीपक पाटकर आणि प्रा. डॉ. मितुषा वर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष प्रशिक्षण पूर्ण केले. या प्रशिक्षणाद्वारे मेंदू, मज्जासंस्था, मणक्याचे विकार तसेच रक्तवाहिन्यांशी संबंधित आजारांचे अत्याधुनिक इमेजिंग तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अचूक निदान करण्याचे कौशल्य त्यांनी आत्मसात केले. सध्याच्या काळात मेंदूविकार, स्ट्रोक, ब्रेन ट्यूमर, स्पाईनचे विकार आणि रक्तवाहिन्यांशी संबंधित आजारांचे वेळेत व अचूक निदान रुग्णांच्या उपचारासाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. अशा परिस्थितीत न्यूरो-रेडिओलॉजीतील त्यांचे विशेष प्रशिक्षण भविष्यात अनेक रुग्णांना लाभदायी ठरेल, असा विश्वास वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

ज्ञान, कौशल्य आणि रुग्णसेवेप्रती असलेली निष्ठा यामुळे डॉ. तरल पाटील यांनी अल्पावधीतच वैद्यकीय क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, अचूक निदानाची दृष्टी आणि सातत्याने ज्ञान अद्ययावत ठेवण्याची वृत्ती यामुळे त्यांच्या या यशाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. त्यांच्या या यशामुळे मराठवाड्यासह वैद्यकीय क्षेत्राचा गौरव वाढला असून भविष्यातही त्या रुग्णसेवेत मोलाचे योगदान देतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### आरक्षण उपवर्गीकरणाला विरोध; रिपाइंद्वारे मुख्यमंत्र्यांना निवेदन : आंदोलनाचा इशारा

**परभणी,/प्रतिनिधी :** अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या प्रस्तावाला विरोध दर्शवत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) जिल्हा शाखेच्या वतीने सोमवार २७ जूलै रोजी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले. उपवर्गीकरणाची प्रक्रिया तातडीने स्थगित करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात अनुसूचित जातींना एकसंघ ठेवण्याच्या उद्देशाने स्वतंत्र प्रवर्गाची रचना केली. मात्र, शासनाने अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरण करण्यासाठी निवृत्त न्यायमूर्ती अनंत बदर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली असून, त्यामुळे समाजात फूट पडण्याची शक्यता आहे, असा आरोप करण्यात आला आहे. समितीचा अहवाल सार्वजनिक होईपर्यंत तसेच २०२७ ची जनगणना पूर्ण होईपर्यंत अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करू नये, अशी मागणी करण्यात आली आहे. शासनाने या मागणीकडे दुर्लक्ष करून उपवर्गीकरणाची अंमलबजावणी केल्यास रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)च्या वतीने राज्यभर तीव्र आणि आक्रमक आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. या निवेदनावर रिपाईचे राज्य संघटक डी.एन.दाभाडे, राज्य सहसचिव ॲड. लक्ष्मण बनसोडे, म.प्र. उपाध्यक्ष डॉ. सिध्दार्थ भालेराव, मराठवाडा नेत्या राणुबाई वायवळ, मराठवाडा संघटक जयप्रकाश इंगोले, म. उपाध्यक्ष उत्तमराव वाव्हळे, जिल्हा सचिव शशिकांत गवळी, ग्रामीण जि.अ. निवृत्ती हत्तीअंबीरे, जिल्हा उपाध्यक्ष शेषराव नंद, साळवे, आनंत साळवे यांच्यासह पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# आरपीएफ नांदेड विभागाची प्रवासी सुरक्षा मोहीम अधिक प्रभावी

## रेल सुरक्षा व नन्हे फरिश्ते अंतर्गत उल्लेखनीय कामगिरी; चोरीच्या मालाची शंभर टक्के वसुली

**परभणी ,/प्रतिनिधी:-** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील रेल्वे सुरक्षा बलाने (आरपीएफ) प्रवाशांची सुरक्षा, रेल्वे मालमत्तेचे संरक्षण आणि रेल्वे परिसरातील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी राबविलेल्या विविध विशेष मोहिमांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. ऑपरेशन यात्री सुरक्षा, ऑपरेशन अमानत, ऑपरेशन रेल सुरक्षा आणि ऑपरेशन नन्हे फरिश्ते अंतर्गत आरपीएफने जीआरपी व स्थानिक पोलिसांच्या समन्वयातून अनेक प्रभावी कारवाया केल्या आहेत.

ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत छत्रपती संभाजीनगर, परभणी, वाशीम आणि हजूर साहिब नांदेड रेल्वे स्थानकांवर संयुक्त मोहिम राबविण्यात आली. या कारवाईत प्रवाशांच्या मालमत्तेवर डल्ला मारण्याच्या तयारीत असलेल्या पाच संशयितांना ताब्यात घेण्यात आले. संबंधित आरोपींविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम, भारतीय न्याय सुरक्षा संहिता (बीएनएसएस) तसेच भारतीय न्याय संहिता (बीएनएस) अंतर्गत गुन्हे दाखल करून आवश्यक कायदेशीर कारवाई करण्यात आली. हजूर साहिब नांदेड रेल्वे स्थानकावर आरपीएफच्या सतर्कतेमुळे मोबाईल चोरी करणाऱ्या एका आरोपीला अटक करण्यात आली. त्याच्या कबुलीजबाबावरून २५ हजार रुपये किमतीचा मोबाईल जप्त करण्यात आला. त्यानंतर संबंधित प्रवाशाचा शोध घेऊन त्याचा मोबाईल सुरक्षितपणे परत करण्यात आला.

ऑपरेशन रेल सुरक्षा अंतर्गत नांदेड रेल्वे यार्डमध्ये उभ्या असलेल्या टॉवर कारमधून तांब्याची कॅटनरी वायर चोरी झाल्याच्या प्रकरणाचा यशस्वी छडा लावण्यात आला.



सीसीटीव्ही फुटेज, गुप्त माहिती आणि सातत्यपूर्ण पाळतीच्या आधारे आरपीएफच्या पथकाने एका रिसिव्हरसह चार आरोपींना अटक केली. या कारवाईत २० हजार २५० रुपये किमतीची संपूर्ण चोरीस गेलेली रेल्वे मालमत्ता तसेच तिच्या विक्रीतून मिळालेली रक्कम जप्त करण्यात आली. त्यामुळे या प्रकरणात चोरीस गेलेल्या मालमत्तेची शंभर टक्के वसुली करण्यात आरपीएफला यश आले.

ऑपरेशन अमानत अंतर्गत रेलमदत तक्रारीवर तातडीने कार्यवाही करत नांदिग्राम एक्स्प्रेसमध्ये एका प्रवाशाकडून विसरलेला डेल कंपनीचा लॅपटॉप सुरक्षित ताब्यात घेण्यात आला. आवश्यक पडताळणीनंतर सुमारे ३५ हजार रुपये किमतीचा लॅपटॉप त्याच्या मालकाकडे सुरक्षितपणे सुपूर्द करण्यात आला. याबद्दल संबंधित प्रवाशाने आरपीएफच्या तत्पर आणि प्रामाणिक सेवेसाठी आभार व्यक्त केले.

दरम्यान, ऑपरेशन नन्हे फरिश्ते अंतर्गत जालना रेल्वे स्थानकावर घरातून निघून आलेल्या दोन अल्पवयीन मुलांची आरपीएफने सुखरूप सुटका केली. त्यांच्या पालकांशी संपर्क साधून पुढील आवश्यक प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर दोन्ही मुलांना बालकल्याण यंत्रणेकडे नियमानुसार सुपूर्द करण्यात आले.

प्रवाशांचा रेल्वे प्रवास अधिक सुरक्षित, संरक्षित आणि निर्भय करण्यासाठी तसेच रेल्वे मालमत्तेचे संरक्षण सुनिश्रि्चत करण्यासाठी आरपीएफ, नांदेड विभाग भविष्यातही गुप्त माहितीवर आधारित कारवाया, संयुक्त मोहिमा आणि सुरक्षा उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविणार असल्याचे रेल्वे सुरक्षा बलाकडून सांगण्यात आले.

## तलाठी व लिपीक परीक्षेसाठी मोफत मार्गदर्शन केंद्र

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील शारदा महाविद्यालयातील हेमराजजी जैन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र आणि ज्ञानदा अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत होणाऱ्या तलाठी (ग्राम महसूल अधिकारी) व लिपीक पदांच्या स्पर्धा परीक्षांसाठी मोफत मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात आले आहे.

तलाठी व लिपीक भरतीसाठी शासनाने सुमारे पाच हजार पदांची जाहिरात प्रसिद्ध केली असून स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही महत्त्वाची संधी आहे. या भरती प्रक्रियेसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत ५ ऑगस्ट असून परीक्षा २५ ऑक्टोबर रोजी होणार आहे. या पार्श्वभूमीवर शारदा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन पवार यांच्या पुढाकारातून परभणी जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी मोफत मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्रात तज्ज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन, अद्ययावत ग्रंथालय, सुसज्ज अभ्यासिका तसेच स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक संदर्भग्रंथांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या मार्गदर्शन वर्गांना ३ ऑगस्टपासून शारदा महाविद्यालयातील हेमराजजी जैन सभागृहात प्रारंभ होणार आहे. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या इच्छुक विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रवेश व अधिक माहितीसाठी प्रा. अशोक चोपडे (९८५०११६७३३) किंवा प्रा. डॉ. प्रशांत मेने (९४२१३९२१३०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन उपप्राचार्य डॉ. श्यामसुंदर वाघमारे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. संतोष नाकाडे, डॉ. सुरेश खिस्ते, डॉ. नितीन बावळे, डॉ. नवनाथ सिंगापूरे आणि डॉ. सचिन खडके यांनी केले आहे.

## बोरवंड येथे वृक्षदिंडीव्दारे पर्यावरण जनजागृती मोहिम



**परभणी,/प्रतिनिधी :** तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बोरवंड बुद्रुक येथे आषाढी एकादशीनिमित्त पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी वारकरी परंपरेसोबतच वृक्षसंवर्धनाचा संदेश देत पर्यावरण जनजागृती केली.

दिंडीमध्ये विद्यार्थ्यांनी टाळ-मृदंगाच्या गजरात पारंपरिक वारकरी वेशभूषा परिधान केली होती. तसेच विविध वृक्षांचे प्रतीकात्मक सादरीकरण करत गावातून वृक्षदिंडी काढण्यात आली. वृक्षारोपण करा, पर्यावरण वाचवा, निसर्गाचे रक्षण करा अशा घोषणांद्वारे विद्यार्थ्यांनी शालेय विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण केली. या उपक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील तसेच ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत दिंडीत सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांच्या पर्यावरणपूरक संदेशाचे उपस्थितांनी कौतुक केले. उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कब मास्टर रामकिशन भोसले, सहाय्यक कब मास्टर खोबराजी वाळवटे, दिलीप हिप्पर, फारूखपाशा सय्यद, पूजा तोटे आणि प्रदीप उंडाळकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

या उपक्रमाचे केंद्रप्रमुख संतोष दराडे (शिंगणापूर), विस्तार अधिकारी मंगेश नरवाडे आणि गटशिक्षणाधिकारी उमेश राऊत यांनी कौतुक करत विद्यार्थी आणि शिक्षकांचे अभिनंदन केले. वारकरी परंपरा आणि पर्यावरण संरक्षणाचा सुंदर संगम घडवून आणणारा हा उपक्रम उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.

## स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यामंदिरच्या तीन विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**परभणी,/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने एप्रिल २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या सातवी उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती (यूपीएस) परीक्षेत स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यामंदिर व उच्च माध्यमिक विद्यालय, सायाळा येथील तीन विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती पात्र ठरत उल्लेखनीय यश संपादन केले.

या परीक्षेत समृद्धी नर्सिंग खटिंग हिने २०० गुण, स्नेहा मुंजाजी खटिंग हिने १६८ गुण, तर स्वराज नारायण खटिंग याने १३६ गुण मिळवून शिष्यवृत्तीसाठी पात्रता प्राप्त केली. या विद्यार्थ्यांचे नूतन विद्या समितीचे अध्यक्ष विजय जोशी, चिटणीस संतोष धारासुरकर, मुख्याध्यापिका तनूजा कापरे, सहायक मुख्याध्यापक पामे, उच्च माध्यमिक विभागप्रमुख दिपक पांडे, सहायक विभागप्रमुख देशपांडे तसेच शिष्यवृत्ती परीक्षेचे मार्गदर्शन करणाऱ्या पांढरे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यास शुभेच्छा दिल्या.

### श्रीमती प्रमिला काला यांचे निधन

**सेलू,/प्रतिनिधी :** येथील जिंतूर कॉलनीतील रहिवासी श्रीमती प्रमिला ताराचंदजी काला यांचे रविवार २६ जूलै रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८७ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात शशिकांत, संजय व डॉ. शैलेंद्र ही तीन मुले, मुली, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.



**परभणी- परभणी- मुख्य कार्यकारी अधिकारी मा. नितीशा माथूर यांच्यासमोर आयुष फोटो अल्बम व डाटा चे सादरीकरण करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा आयुष अधिकारी डॉ. गजानन परळीकर, आयुष अधिकारी, कर्मचारी व योग प्रशिक्षक दिसत आहेत.**

## खोलगाडगा येथील शेतरस्ता खुला करण्याची मागणी; रिपब्लिकन युवा सेनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**परभणी,/प्रतिनिधी-**खोलगाडगा येथील शेतरस्ता खुला करण्याची मागणी; रिपब्लिकन युवा सेनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन; तहसीलदारांवर कारवाईची मागणी

जिंतूर तालुक्यातील मौजे खोलगाडगा येथील मागासवर्गीय शेतकऱ्यांचा अडविण्यात आलेला शेतरस्ता (पांदण रस्ता) दोन दिवसांच्या आत पोलीस बंदोबस्तात खुला करण्यात यावा तसेच कर्तव्यात गंभीर कसूर केल्याचा आणि मागासवर्गीय महिलांशी अरेरावी व अपमानास्पद वर्तन केल्याचा आरोप असलेल्या जिंतूरच्या तहसीलदारांवर ॲट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल करून तात्काळ निलंबित करावे, अशी रिपब्लिकन युवा सेनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

रिपब्लिकन युवा सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रीतम वाकळे यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांच्या वतीने हे निवेदन सादर करण्यात आले. प्रशासनाने या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. येत्या दोन दिवसात मागण्यांवर योग्य ती कारवाई न झाल्यास रिपब्लिकन युवा सेनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अर्धनग्न आंदोलन करण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे.

## आर.पी. हॉस्पिटलकडून मोफत बस सेवा सुरू- आ.डॉ. राहुल पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

**परभणी ,/प्रतिनिधी-:** परभणी येथील आर. पी. हॉस्पिटल अँड रिसर्च इन्स्टिट्यूटने रुग्णसेवेच्या उद्देशाने आणि रुग्णांची गैरसोयी टाळण्यासाठी शहरातील उघडा महादेव परिसरातील रचना नगर येथून मोफत बस सेवेचा शुभारंभ आमदार डॉ. राहुल पाटील यांच्या हस्ते सोमवार, दि. २७ जुलै रोजी करण्यात आला. यापूर्वी परभणी बसस्थानक ते आर.पी. हॉस्पिटल अशी रूग्ण आणि नातेवाइकांसाठी मोफत बस सेवा सुरू आहे.

नव्याने सुरू करण्यात आलेली मोफत बस उघडा महादेव परिसरातील रचना नगर येथून सकाळी १० वाजता निघणार आहे. त्यानंतर उघडा महादेव मंदिर १०.१५, देशमुख हॉटेल १०.३०, हडको कॉर्नर १०.४५, सारनाथ कॉलनी पाटी ११.००, खंडोबा बाजार ११.१५, अपना कॉर्नर ११.३०, पारदेश्वर मंदिर ११.४५ या मार्गे ही बस आर. पी. हॉस्पिटल येथे जाणार आहे. परतीच्या प्रवासात ही बस आर. पी. हॉस्पिटल येथून दुपारी ४ वाजता निघून याच मार्गाने परत येणार आहे. यापूर्वी खानापूर फाटा-वसमत रोड- बस स्थानक मार्गे मोफत बस सेवा सुरू आहे. या बसला रुग्णांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. आर.पी. हॉस्पिटलचे प्रमुख आणि आ. डॉ. राहुल पाटील यांनी या उपक्रमाबद्दल सांगितले, रुग्णांना वेळेवर आणि मोफत वैद्यकीय सेवा मिळावी, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. मोफत बस सेवेमुळे ग्रामीण भागातील रुग्णांना हॉस्पिटलपर्यंत पोहोचणे सोयीचे होईल आणि त्यांचा उपचाराचा प्रवास सुखकर होईल. मोफत तपासणी आणि परवडणाया दरातील वैद्यकीय सुविधांमुळे प्रत्येक रुग्णाला दर्जेदार उपचार मिळतील असे आ. पाटील यांनी सांगितले.




यावेळी महानगरप्रमुख डॉ. विवेक नावंदर, महापौर सय्यद इकबाल, सभागृह नेता माजु लाला, नगरसेवक बबलू घागरमाळे, अरविंद देशमुख, रामराव डोंगरे, संदिप झाडे, दिनेश बोबडे, सुनील पंढरकर, अमित भालेराव, राहुल खटींग, बाळराजे तळेकर, विशू डहाळे, शिवलिंग बोधने, विशाल तळेकर, सुशील नर्सीकर, शुभम गिरी, गोपाळ कदम, शिवा माटोरे, धनराज चव्हाण, इरफान काजी, विवेक ढवळे, अब्दुल्ला राज, असलम शेख, जाँबाज खान,तुराब खान, आनंद हत्तीअंबीरे, देवांष चिटकरे, सुमेध घागरमाळे, गणेश मोरे, प्रल्हाद देवढे, संदिप पांगरकर, मकरंद कुलकर्णी, दामोधर सानप आदिसह शिवसैनिक, युवासैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# लिगो प्रकल्पाबाबत जिल्हाधिकाऱ्यांची उद्योजकांसोबत महत्वपूर्ण बैठक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ जुलै**

औंढा नागनाथ तालुक्यातील मौजे दुधाळा येथे प्रस्तावित लिगो इंडिया प्रकल्पाच्या अनुषंगाने शासन निर्णयानुसार लागू करण्यात आलेल्या विविध विकासकामांचे निर्बंध शिथील करण्याच्या मागणीवर लिगो एम्पावर्ड बोर्डाच्या बैठकीत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन अणुऊर्जा व संशोधन विकास विभागाचे संचालक नितीन जावळे यांनी सोमवार दि २७ रोजी दिले आहेत.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयात लिगो प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर बैठक झाली. यावेळी अणुऊर्जा संशोधन व विकास विभागाचे संचालक नितीन जावळे, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, लिगो इंडिया प्रकल्प समन्वयक समीर जाधव, खनिकर्म अधिकारी आश्विनकुमार माने, जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक रवींद्र पत्की, उद्योग समुह संघटनेचे ज्ञानेश्वर मामडे, प्रवीण सोनी, नितीन राठोड, रमेश पंडीत तसेच जिल्ह्यातील स्टोन क्रेशर उद्योजकही बैठकीस उपस्थित होते.

या बैठकीत लिगो इंडिया प्रकल्पाच्या सीमारेषेपासून पाच ते ६० किलोमीटर परिसरात लागू असलेल्या विविध निर्बंधांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. स्टोन क्रेशर, खाणकाम, ब्लास्टींगवर आधारीत उद्योग, २० अश्वशक्तीपेक्षा अधिक ऊर्जा लागणारे रेसीप्रोकेटींग क्रियाकल्प, नवीन वीज प्रकल्प, नवीन रेल्वे मार्ग तसेच पवनचक्की उभारणीवरील निर्बंधाबाबत सखोल चर्चा करण्यात आली. हिंगोली जिल्ह्याच्या औद्योगिक आणि पायाभूत सुविधांच्या विकासाला गती मिळावी यासाठी लिगो इंडिया प्रकल्प कार्यान्वित होईपर्यंत संबंधीत निर्बंध शिथील करण्यात यावेत तसेच काही निर्बंधांमध्ये अंशतः सूट देण्यात यावी, अशी विनंती जिल्हा प्रशासन व उद्योग समुहाच्यावतीने करण्यात आली.

यावर संचालक नितीन जावळे यांनी जिल्हा प्रशासन व उद्योग प्रतिनिधींनी मांडलेल्या सूचनांवर लिगो इंडिया एम्पावर्ड बोर्डाच्या बैठकीत सविस्तर चर्चा करून सकारात्मक निर्णय घेण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येतील असे आश्वासन दिले. त्यानंतर जावळे यांच्या पथकाने जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्यासमवेत लिंबाहा एमआयडीसी परिसरातील किर्ती गोल्ड, शिवपार्वती ऑईल मिल तसेच पंचतत्व उद्योगांना भेट देऊन उत्पादन प्रक्रिया, बाटली निर्मिती व पाणी शुध्दीकरण प्रक्रियेची पाहणी केली. तसेच औंढा नागनाथ तालुक्यातील मौजे दुधाळा येथील प्रस्तावित लिगो इंडिया प्रकल्प स्थळालाही भेट देऊन तेथील परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेतला.

# कारगील वीरांचे बलिदान प्रत्येक भारतीयांसाठी प्रेरणादायी- गुप्ता



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ जुलै**

कारगील युद्धात देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या वीर जवानांचे शौर्य, त्याग आणि राष्ट्रनिष्ठा प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले.

कारगील विजय दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते भारत मातेच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कारगील युद्धातील हुतात्मा जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी त्यांनी कारगील युद्धातील शहीद जवानांचे स्मरण करून त्यांच्या त्यागातून प्रत्येक भारतीयाला राष्ट्रप्रेमाची प्रेरणा मिळत असल्याचे सांगितले. तसेच उपस्थित माजी सैनिकांना शुभेच्छा देत त्यांच्या सेवाभावाचा गौरव केला.

या कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी अभिमन्यू बोधवड, उपजिल्हाधिकारी अनिल माचेवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी अभिमन्यू बोधवड यांनी कारगील विजय दिनाचे महत्त्व अधोरेखित करत देशाची एकता, अखंडता आणि सामाजिक ऐक्य अबाधित राखण्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या वीर जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा दिवस साजरा केला जात असल्याचे सांगितले. तसेच माजी सैनिकांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी जिल्हा प्रशासन सदैव तत्पर असल्याचे त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमात हिंगोली जिल्हा माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष सय्यद मीर, सुभेदार मेजर पुंडगे भीमराव, बाबूराव जांबुतकर, पंडित हाके, आर. के. मांडगे, के. एम. जाधव, बाबूराव गाडे, भगवान चव्हाण यांच्यासह कारगील व इतर युद्धात वीरमरण आलेल्या सैनिकांच्या वीर पत्नी आणि वीर मातांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी जिल्हा सैनिक कल्याण संघटक कॅप्टन तुकाराम मुकाडे, खराटे संघपाल, कडुजी टापरे, सिताराम फुपाटे तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

# खरीप हंगाम पीकस्पर्धेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ जुलै**

राज्यातील शेतकऱ्यांमध्ये आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा प्रसार, उत्पादकतेत वाढ आणि प्रगतशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने कृषी विभागामार्फत खरीप हंगाम २०२६-२७ साठी अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकांची राज्यस्तरीय पीकस्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. यासाठी शेतकऱ्यांनी ऑनलाइन प्रणालीद्वारे अर्ज करण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

यापूर्वी पीकस्पर्धेची प्रक्रिया ऑफलाइन पद्धतीने राबविण्यात येत होती. मात्र, प्रशासनात पारदर्शकता व गतिमानता आणण्यासाठी खरीप हंगाम २०२६ पासून स्वतंत्र ऑनलाइन पोर्टलद्वारे अर्ज स्वीकारण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तालुका, जिल्हा आणि राज्य या तीन स्तरांवर स्पर्धा होणार असून, सर्वसाधारण व आदिवासी गटातील शेतकऱ्यांमधून विजेत्यांची निवड करण्यात येणार आहे.

या स्पर्धेत भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग आणि सूर्यफूल या एकूण ११ पिकांचा समावेश करण्यात आला आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी संबंधित जमीन शेतकऱ्याच्या स्वतःच्या नावावर असणे व ती स्वतः कसत असणे आवश्यक आहे. एका शेतकऱ्यास एकाच वेळी एका पिकासाठीच स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. भात पिकासाठी किमान २० गुंठे, तर इतर पिकांसाठी किमान ४० गुंठे सलग लागवड क्षेत्र असणे आवश्यक आहे.

अर्जासोबत फार्मर आयडी, प्रवेश शुल्क भरल्याची पावती, आवश्यकतेनुसार जात प्रमाणपत्र तसेच बँक खाते किंवा पासबुकच्या पहिल्या पानाची प्रत जोडणे आवश्यक आहे. मूग व उडीद पिकांसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६, तर भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी, तूर, सोयाबीन, भुईमूग आणि सूर्यफूल पिकांसाठी ३१ ऑगस्ट २०२६ निश्चित करण्यात आली आहे.

अधिकाधिक शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या संकेतस्थळावरील पीक स्पर्धा नोंदणी टॅबद्वारे ऑनलाइन अर्ज करून या स्पर्धेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.



**हिंगोली- सेनगाव तालुक्यातील केंद्रा येथील मातंग समाजावर होणाऱ्या अन्यायाविरोधात लहुजी शक्ती सेनेच्यवतीने आमरण उपोषण सुरू केले असून या उपोषणाला महिला, पुरूष मोठ्या संख्येने बसले आहेत. मागण्या मान्य होईपर्यंत उपोषण सोडणार नाही असा निर्धार करण्यात आला आहे. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### डिग्रस कऱ्हाळे शाळेत पोलिसांची जनजागृती



हिंगोली- तालुक्यातील डिग्रस कऱ्हाळे येथील स्वामी विवेकानंद विद्यालय येथे हिंगोली जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या आदेशाने सायबर रस्ते सुरक्षा महिला सुरक्षा अमली पदार्थ विरोधी जनजागृती मोहीम कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक शामराव जगताप तसेच हिंगोली ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक राहुल घुले, बीट जमादार सुधीर ठोंबरे, तांबारे, सामाजिक कार्यकर्ते शिवाजी कऱ्हाळे यांच्यासह शाळेतील विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक वृंद उपस्थित होते. यावेळी पोलीस उपनिरीक्षक राहुल घुले यांनी रस्त्यावरून वाहन चालवताना वाहतुकीचे नियमाचे काटेकोर पालन केले पाहिजे. मुलींनी, महिलांनी अन्याय अत्याचार बाबतीत पोलिसांना सांगितले पाहिजे तसेच सायबर गुन्हे अमली पदार्थ बाबत पोलीस उपनिरीक्षक राहुल उगले यांनी माहिती दिली. विद्यार्थिनींनी सतत नैतिक आचरण महापुरुषाचे जीवन चरित्रानुसार वर्तन करण्यास यावेळी घुले यांनी सांगितले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक यांनी उपस्थित मार्गदर्शन करणाऱ्या मान्यवरांचे स्वागत केले.

### विवाहीतेचे आधार, पॅन देण्यास टाळाटाळ

हिंगोली- सेनगाव तालुक्यातील सुकळी येथील विवाहीता अनुसया सुधाकर धाकतोडे यांचे ४ मार्च २०१० रोजी सुधाकर धाकतोडे यांच्याशी लग्न झाले होते. परंतु सासरच्या लोकांकडून जाच होत होता. अखेर सासरच्यांनी विवाहीतेला दि २६ डिसेंबर २०१२ रोजी मारहाण करून घराबाहेर काढले. तेव्हापासून विवाहीता तिच्या आई वडीलांकडे हिंगोली अंधारवाडी येथे राहत आहे. याप्रकरणाबाबत भरोसा सेल, पोलिस अधीक्षक कार्यालयात रितसर कार्यवाही सुरू आहे. परंतु विवाहीतेचे आधार कार्ड, पॅन कार्ड व इतर आवश्यक कागदपत्रे पतीने ठेवून घेतले आहेत. सदरील कागदपत्रे मागण्यास सदरील विवाहीता सेनगाव पोलिस ठाण्यात चकरा मारीत आहे. सदरील कागदपत्रांची नितांत आवश्यकता असून ती तत्काळ द्यावी अशी मागणी विवाहीतेने सेनगाव पोलिसांकडे केली आहे.

### कळमनुरीत नालेसफाईची पोलखोल

हिंगोली- कळमनुरी शहरात दि २७ जुलै रोजी सायंकाळी पावसाने अनेक दिवसानंतर हजेरी लावली. सुमारे एक ते दिड तास झालेल्या पावसामुळे शहरातील घरे, दुकाने तसेच रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर पाणी साचले होते. कळमनुरी नगर परिषदेने शहरातील नाले सफाई केल्याचा दावा केला असला तरीही सोमवारी झालेल्या पावसाने नगर पालिकेच्या दाव्याची पोलखोल केली आहे. शहरातील घरांमध्ये तसेच दुकानांमध्ये नाल्यातील घाण पाणी शिरल्यामुळे नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला असून तत्काळ नालेसफाई करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.

# वसमत तालुक्यातील विकास कामांना गती द्या- जिल्हाधिकारी राहुल गुप्ता

## दुरदृश्य प्रणालीद्वारे विकास कामांचा आढावा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ जुलै**

वसमत तालुक्यातील विविध विकासकामे गुणवत्तापूर्ण व निर्धारित कालावधीत पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करावे, तसेच प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आज दूरदृश्यप्रणालीद्वारे वसमत तालुक्यातील विविध विकासकामांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी उपविभागीय अधिकारी विकास माने, तहसीलदार सारंग चव्हाण, नगर पालिका प्रशासनाचे सहआयुक्त गणेश गांजरे, मुख्याधिकारी आशुतोष चिंचाळकर, क्रीडा अधिकारी आत्माराम बोथीकर तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी वसमत येथील गोदाम व क्रीडा संकुलाच्या कामांचा आढावा घेत प्रलंबित कामे वेगाने पूर्ण करण्याचे निर्देश दिले. तसेच ट्रॉमा सेंटरसाठी आवश्यक जागा आरक्षित करण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्यास सांगितले.

पारडी येथील एमआयडीसीसाठी हस्तांतरीत केलेल्या जमिनीवरील अतिक्रमणधारकांना नियमानुसार नोटिसा देऊन अतिक्रमणे हटविण्याची कार्यवाही करावी. खांडेगाव येथील गायरान जमीन नगर परिषद वसमत यांना घनकचरा व्यवस्थापनासाठी द्यावयाची आहे. त्यासाठी मागणी प्रस्ताव अ,ब,क,ड मध्ये भरुन तात्काळ सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी दिल्या. तसेच टाकळगव्हाण (खोपा) येथील १३२ केव्ही वीज उपकेंद्रासाठी रस्ता तयार करणे आणि सतीपांगरा येथील जलसंधारणाच्या कामांचा आढावा घेऊन आवश्यक त्या कार्यवाहीला गती देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

यावेळी विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी संबंधित कामांच्या प्रगतीचा आढावा सादर केला. जिल्हाधिकाऱ्यांनी प्रलंबित कामे वेळेत पूर्ण करून विकासकामांमध्ये कोणत्याही प्रकारचा विलंब होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या.

# छत्रपती शिवाजी महाराज चौक ते रिसाला रेल्वे पूल रस्त्यावर खड्डे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ जुलै**



हिंगोली शहरातील अत्यंत महत्त्वाचा आणि रोजच्या मोठ्या रहदारीचा समजला जाणारा छत्रपती शिवाजी महाराज चौक ते रिसाला रेल्वे पूल हा मुख्य रस्ता सध्या भयंकर खड्ड्यांमुळे मृत्यूचा सापळा बनला आहे. मागील अनेक वर्षांपासून हा रस्ता मंजूर झालेला होता, मात्र काही ना काही कारणास्तव हे काम सतत रखडलेलेच राहिले.

दरम्यान, अवघ्या पंधरा दिवसांपूर्वी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या हस्ते या रस्त्याचे थाटामाटात भूमिपूजन करण्यात आले होते. भूमिपूजन झाल्यामुळे आता तरी या रस्त्याचे भाग्य उजळेल आणि लवकरात लवकर नवीन रस्ता तयार होऊन प्रवाशांची त्रासातून सुटका होईल, अशी आशा हिंगोलीकर नागरिकांना व वाहनधारकांना होती. परंतु, भूमिपूजनाचा थाट ओसरताच हे काम पुन्हा जैसे थे परिस्थितीत येऊन थांबले आहे.

या रस्त्याच्या बांधकामासाठी लागणारा निधी आधीच मंजूर झालेला आहे. जर निधी उपलब्ध आहे आणि लोकप्रतिनिधींच्या हस्ते भूमिपूजनही पार पडले आहे, तर मग जिल्हा प्रशासन आणि संबंधित विभागाने या कामाकडे अचानक का दुर्लक्ष केले? असा प्रश्न आता उपस्थित होत असून याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. रस्त्यावरील मोठ्या खड्ड्यांमुळे दररोज लहान-मोठे अपघात होत असून नागरिकांचे व वाहनधारकांचे प्रचंड हाल होत आहेत. जिल्हा प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन या मुख्य रस्त्याचे काम लवकरात लवकर सुरू करून दुरुस्ती करावी, अशी आक्रमक मागणी परिसरातील नागरिकांमधून केली जात आहे.

# बियाणे तक्रारींचे तत्काळ निवारण करून दोषींवर कारवाई करा- गुप्ता

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ जुलै**

शेतकऱ्यांकडून प्राप्त झालेल्या बियाणे तक्रारींचे तातडीने व पारदर्शक पद्धतीने निवारण करावे. तसेच बोगस बियाणे विक्री करणाऱ्या विक्रेत्यांविरुद्ध कठोर कारवाई करून त्यांना काळ्या यादीत समाविष्ट करण्यासाठी आवश्यक प्रस्ताव तातडीने सादर करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयात बियाणे तक्रारींच्या अनुषंगाने बियाणे कंपन्यांच्या प्रतिनिधींची आढावा बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीस जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रदीप कच्छवे, कृषी विकास अधिकारी अतुल वायसे तसेच विविध बियाणे कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीत जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी जिल्ह्यात प्राप्त झालेल्या बियाणे तक्रारींच्या अनुषंगाने संबंधित बियाणे कंपन्यांनी केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर आढावा घेतला. तसेच प्राप्त तक्रारींवर कृषी विभागामार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल सादर करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी बोगस बियाणे विक्री करणाऱ्या विक्रेत्यांविरुद्ध नियमानुसार कठोर कारवाई करून त्यांना काळ्या यादीत समाविष्ट करण्यासाठी आवश्यक प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिल्या. शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी बियाण्यांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या बैठकीत बियाणे कंपन्यांच्या प्रतिनिधींनी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती सादर केली. तसेच शेतकऱ्यांच्या तक्रारींचे वेळेत निवारण करण्यासाठी समन्वयाने काम करण्याबाबत चर्चा करण्यात आली.

# नैसर्गिक शेती शाळेत शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ जुलै**




कृषी विभागाच्या आत्मा योजनेअंतर्गत औंढा नागनाथ तालुक्यातील मौजे कंजारा येथे नैसर्गिक शेती शाळेचे आयोजन करण्यात आले. या शेती शाळेत शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीतील विविध तंत्रज्ञान, जैविक निविष्ठांची निर्मिती व वापर तसेच जैविक पद्धतीने कीड व रोग व्यवस्थापन याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमास तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक के. एस. घुगे, सेंद्रिय शेती तज्ज्ञ मार्गदर्शक डी. एन. गुंठे उपस्थित होते. त्यांनी नैसर्गिक शेतीमुळे उत्पादन खर्चात बचत होण्याबरोबरच जमिनीचे आरोग्य सुधारते, पर्यावरणाचे संवर्धन होते आणि सुरक्षित अन्न उत्पादनास चालना मिळते, असे सांगितले. तसेच जैविक निविष्ठा स्वतः तयार करून त्यांचा प्रभावी वापर करण्याचे आणि रासायनिक कीटकनाशकांऐवजी जैविक उपायांचा अवलंब करण्याचे आवाहन त्यांनी शेतकऱ्यांना केले.

या कार्यक्रमासाठी आयोजक शेतकरी शंकरराव कल्याणकर, गजाननराव कल्याणकर, रामराव कल्याणकर तसेच परिसरातील अनेक शेतकरी उपस्थित होते. उपस्थित शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीबाबत विविध प्रश्न विचारून तज्ज्ञांकडून मार्गदर्शन घेतले. आत्मा योजनेअंतर्गत अशा प्रकारच्या नैसर्गिक शेती शाळांमुळे शेतकऱ्यांमध्ये शाश्वत शेती पद्धतींचा प्रसार होऊन पर्यावरणपूरक व खर्चात बचत करणाऱ्या शेतीला चालना मिळत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# परभणी-मुदखेड रेल्वे मार्गाच्या आधुनिकीकरणासाठी १६३ कोटी मंजुर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २८ जुलै -**

भारतीय रेल्वेने दक्षिण-मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील परभणी-मुदखेड दुहेरी रेल्वे मार्गाच्या आधुनिकीकरणासाठी महत्त्वाचा निर्णय घेताना १६३ कोटींच्या प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. या प्रकल्पाअंतर्गत मार्गावरील विद्यमान इलेक्ट्रीक ट्रॅक्शन (विद्युत पुरवठा) प्रणालीचे संपूर्ण आधुनिकीकरण करण्यात येणार असून, त्यामुळे या मार्गावरील प्रवासी तसेच मालवाहतूक रेल्वेची क्षमता आणि गती दोन्हीमध्ये लक्षणीय वाढ होणार आहे. विशेष म्हणजे, भविष्यात 'वंदे भारत एक्स्प्रेस'सारख्या वेगवान रेल्वेगाड्यांचे अधिक कार्यक्षम संचालन करण्यासाठीही हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे.

या प्रकल्पांतर्गत सुमारे १६४ ट्रॅक रेल्वे मार्गावर सध्या कार्यरत असलेली १२५ केव्ही इलेक्ट्रिक ट्रॅक्शन प्रणाली बदलून अत्याधुनिक आणि अधिक क्षमतेची २२५ केव्ही प्रणाली बसविण्यात येणार



आहे. त्याचबरोबर वाढीव वीजभार हाताळण्यासाठी आवश्यक असलेल्या वीज पुरवठा यंत्रणा, उपकेंद्रे आणि संबंधित पायाभूत सुविधांचेही आधुनिकीकरण केले जाणार आहे. यामुळे रेल्वेगाड्यांना अधिक स्थिर आणि अखंड वीजपुरवठा उपलब्ध होईल, तसेच रेल्वे वाहतुकीतील अडथळे कमी होण्यास मदत होईल.

परभणी-मुदखेड रेल्वे मार्ग हा भारतीय रेल्वेच्या 'हायली युटिलाइज्ड नेटवर्क' (एचयूएन रूट-९) मधील अत्यंत महत्त्वाचा दुवा मानला जातो. हा मार्ग अजमेर, इंदूर, खंडवा, अकोला, पूर्णा, मुदखेड, सिकंदराबाद, मेहबूबनगर आणि धोन यांसारख्या प्रमुख शहरांना आणि औद्योगिक क्षेत्रांना जोडतो. त्यामुळे या मार्गावरील क्षमतावाढीचा थेट लाभ प्रवासी वाहतूक, उद्योग आणि व्यापार क्षेत्रालाही होणार आहे.

या आधुनिकीकरणामुळे उच्च वेगाच्या रेल्वेगाड्या अधिक सुरक्षित आणि कार्यक्षम पद्धतीने धावू शकतील. तसेच मालवाहतूक रेल्वेची वहनक्षमताही वाढणार असल्याने भारतीय रेल्वेने २०२९-३० पर्यंत ३,००० दशलक्ष टन मालवाहतुकीचे निर्धारित केलेले उद्दिष्ट गाठण्यास मोठी मदत होणार आहे. वाढत्या रेल्वे वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर देशातील सर्वाधिक वर्दळीच्या मार्गांची क्षमता वाढविण्यासाठी आणि आधुनिक रेल्वे पायाभूत सुविधा उभारण्यासाठी हा प्रकल्प एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

# शाळांतील समस्यांची संदेश केराम यांनी घेतली दखल

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २८ जुलै -**

युवा नेते संदेश केराम यांनी माहूर तालुक्यातील विविध गावांचा दौरा करून जिल्हा परिषद प्राथमिक शाळांतील शैक्षणिक सुविधा, विद्यार्थ्यांच्या अडचणी आणि मूलभूत गरजांचा आढावा घेतला. यावेळी शाळांमध्ये उपलब्ध सुविधा, पायाभूत सोयी तसेच आवश्यक सुधारणा याबाबत संबंधितांशी चर्चा करण्यात आली.

संदेश केराम यांनी रुई, अणमाळ, दिगडी खुर्द, हिवळेश्वर, महादापूर आणि शिवूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना भेट देत शिक्षक व ग्रामस्थांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासह आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा केला जाईल, असे त्यांनी यावेळी सांगितले.

यानंतर महादापूर येथील पुलाच्या दुरवस्थेची प्रत्यक्ष पाहणी करून पुलाची स्थिती जाणून घेतली. नागरिकांच्या दैनंदिन वाहतुकीच्या दृष्टीने हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी संबंधित यंत्रणेला आवश्यक सूचना देण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

या दौऱ्यात तालुका मंडळ अध्यक्ष नीलकंठ मस्के, आमदारांचे स्वीय सहाय्यक प्रकाश कुडमते, जनसंपर्क अधिकारी संतोष मरस्कोल्हे, जीवन अग्रवाल, सुभाष



कोहाड, देवेंद्र कोवे, आमदारांचे आरोग्य दूत अमन कुंडगीर, विशाल खरे, बालाजी मडावी, प्रीतम गेडाम, श्यामराव कुमरे, शिवा पवार, अनिल कनाके, आशुतोष बेंद्रे, वेंकटेश गीते, रवी रापणवाड तसेच संदेश भाऊ केराम मित्र मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## नांदेड जिल्हा कुलेकडगी समाज संघ, नांदेडच्या वतीने गुणवंत विद्यार्थी सत्कार

**नांदेड-** संस्थापक अध्यक्ष कै. माधवराव कस्तुरे गुरुजी व संस्थापक सचिव कै. प्रा. हरिदास कवडे यांच्या जयंतीनिमित्त नांदेड जिल्हा कुलेकडगी समाज संघ, नांदेड च्यावतीने प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी समाजातील दहावी, बारावीतील गुणवंत व पाचवी, आठवी शिष्यवृत्तीधारक, एम.बी.बी.एस. व बी.एस.एम.एस. प्रवेशित, कृषीनिष्ठ शेतकरी, नव्याने सेवेत रुजू झालेले कर्मचारी तसेच सेवानिवृत्त कर्मचारी यांचा सन्मान केरण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष राजेश्वर गाडे उद्योजक तेलंगणा, प्रमुख वक्ते विपिन कळसकर कक्ष अधिकारी मंत्रालय मुंबई, व एकनाथराव पावडे सेवानिवृत्त विक्रीकर निरीक्षक तर प्रमुख पाहुणे एच.व्ही. आरगुंडे उपसचिव, मुख्यमंत्री कार्यालय मुंबई, सुरेशराव ईटकापल्ले उद्योजक मुंबई, बालाजी तुमवाड सेवानिवृत्त मुख्याध्यापक, समाज संघटनेचे अध्यक्ष भगवानराव राचेवाड, माजी अध्यक्ष आनंदराव आनंतवाड, संस्थापक अध्यक्ष यांचे चिरंजीव शिवाजीराव कस्तुरे संस्थापक सचिव यांची पत्नी गिरजाबाई कवडे हे उपस्थित होते. हा प्रेरणादायी कार्यक्रम रविवार, दि. २६ जुलै रोजी कै. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह (स्टेडियम), नांदेड येथे आयोजित करण्यात आला होता. उद्योजक सुरेशराव ईटकापल्ले मनोगत व्यक्त करताना म्हणाले विद्यार्थ्यांनी, पुरूषांनी व महिलांनी शिक्षणासोबतच व्यवसायाची कास धरावी, असे सांगून वसतिगृहातील विद्यार्थी श्रीराम बकवाड, दत्ता आनंतवाड, वेदांत मुंगेवाड या आठवी शिष्यवृत्तीधारक व एन.एम.एम.एस. शिष्यवृत्तीधारक आणि इतर प्रगतीसाठी जिल्हा संचालक मंडळ व वसतिगृह समितीचे अभिनंदन केले. मोबाईलने जगाला जवळ केले आणि कुटुंबाला दूर केले यापासून विद्यार्थ्यांना बारावीपर्यंत दूर ठेवा, अशी विनंती सेवानिवृत्त मुख्याध्यापक बालाजी तुमवाड यांनी केली. प्रमुख वक्ते विपिन कळसकर यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी व पालकांनी आपण जोपासत असलेल्या सवयी यातूनच व्यक्तिमत्त्व व चारित्र्य संपन्न होते, त्यासाठी चांगल्या सवयीची जोपासना करावी, असा सल्ला दिला. ते पुढे म्हणाले आज तरूणांचा कल वाईट गोष्टींकडे आहे. तरूणांनी स्वतः काळजी घ्यावी कारण आपण सक्षम नसेल तर या स्पर्धेच्या युगात टिकू शकणार नाही. त्यासाठी आपण स्किल डेव्हलपमेंटवर लक्ष द्या. एआयच्या युगात आपणास व्यक्तीसोबत नव्हे तर मशिनसोबत स्पर्धा करावी लागणार आहे, त्यासाठी लागणारे सर्व स्किल संपादन करा. त्यासोबत आनंदी राहण्याची कला जोपासली पाहिजे. प्रमुख पाहुणे एच.व्ही आरगुंडे यांनी वसतिगृहातील संचालक मंडळ, जिल्हा संचालक मंडळ, तालुका प्रमुख यांचे कौतुक करत राजेश्वर गाडे यांनी समाजहितासाठी जे दायीत्व स्वीकारले त्यांचही कौतुक केले. वसतिगृहातील विद्यार्थी संख्या लवकरच शंभर करायची आहे. तसेच मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृह सुरू करायचे आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष राजेश्वर गाडे यांनी आपणही समाजाचे देणे आहेत या भावनेतून अनेक वर्षांपासून काहीतरी देणगी देऊ असली भावना होती आहे, असे ते म्हणाले आणि वसतिगृहाचे जे बांधकाम चालू आहे त्याचा चौथा मजला अतिशय चांगल्या पद्धतीने बांधून देणार तसेच काम पूर्ण झाल्यानंतर एक वर्षाचे मेंटेनन्सही देण्याचे मान्य केले. संघटीत राहा व्यसनापासून दूर राहा, समाज संघटनेची ताकत फार मोठी असते, असे उद्गार काढले.प्रास्ताविक समाज संघटनेचे सचिव विठ्ठलराव रोडे यांनी मांडले. सुंदर सूत्रसंचालन मुकुंद उपासे व अवधुत तमलवाड यांनी केले, तर आभार शिवानंद खदगावे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आजी, माजी जिल्हा संचालक, तालुका प्रमुख वसतिगृह समिती संचालक, इतर शिक्षक, कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## रास्तभाव दुकानांच्या परवान्यांसाठी अर्ज भरण्यास १२ ऑगस्ट पर्यंत मुदतवाढ

**नांदेड** -राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील विविध कारणांमुळे रिक्त असलेल्या व पर्यायी व्यवस्थेत असलेल्या १२२ रास्तभाव दुकानांच्या जागांवर नवीन परवान्यांसाठी अर्ज भरण्याची मुदत बुधवार १२ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. तसेच प्राप्त अर्जांवर आक्षेप व हरकती नोंदविण्यासाठीही मुदत शुक्रवार ३१ जुलै २०२६ पर्यंत निश्चित करण्यात आली आहे.

शासन निर्णय ६ जुलै २०१७ व २ फेब्रुवारी २०२२ मधील तरतुदींनुसार विविध कारणांमुळे (परवाना रद्द होणे, राजीनामा, मृत्यू, वैद्यकीय रजा आदी) रिक्त झालेल्या आणि सध्या पर्यायी व्यवस्थेत सुरू असलेल्या १२२ रास्तभाव दुकानांसाठी नवीन परवाने मंजूर करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या प्रक्रियेमध्ये अधिक पारदर्शकता राहावी व सर्व पात्र संस्थांना पुरेशी संधी मिळावी या कारणास्तव अर्ज करण्याकरिता पुढीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे. या प्रक्रियेत अधिक पारदर्शकता राहावी आणि सर्व पात्र संस्थांना अर्ज करण्याची संधी मिळावी यासाठी नवीन अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १२ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. तसेच सदर जाहिरातीबाबत प्राप्त अर्जांवर आक्षेप किंवा हरकती नोंदविण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ निश्चित करण्यात आली आहे. इच्छुक पात्र स्थानिक संस्थांनी, ग्रामपंचायत, नोंदणीकृत स्वयंसहाय्यता बचतगट, नोंदणीकृत सहकारी संस्था, महिला बचत गट आदींनी संबंधित तहसीलदार कार्यालयाशी संपर्क साधून मुदतवाढीच्या कालावधीत अर्ज किंवा आक्षेप सादर करावेत. विहित मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा किंवा आक्षेपांचा विचार केला जाणार नाही, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड यांनी केले आहे.

# आ. चिखलीकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश; कंधार व दिग्रस मंडळांचा पीकविमा मंजूर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २८ जुलै -**

नांदेड जिल्ह्यातील पीकविमा प्रकरणात प्रलंबित असलेल्या १४ मंडळांसाठी सुमारे ८१ कोटींची रक्कम आज ऑनलाइन पद्धतीने विमा कंपनीकडे जमा होणार असून, त्यामुळे हजारो शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. विशेषतः कंधार मंडळासाठी ८ कोटी ७१ लाख आणि दिग्रस मंडळासाठी ११ कोटी ६१ लाख रुपयांचा पीक विमा मंजूर झाला आहे. यासाठी आ . प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. या दोन्ही मंडळांतील पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर येत्या आठ दिवसांत विमा रक्कम जमा होण्याची प्रक्रिया सुरू होणार असल्याची माहिती आ. चिखलीकर यांच्या संपर्क कार्यालयातून देण्यात आली आहे.



कंधार-लोहा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा केला होता. शेतकऱ्यांना पीकविमा मिळण्यात होत असलेल्या विलंबाबाबत त्यांनी शासन आणि संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार पाठपुरावा करून निधी तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश आले असून, प्रलंबित निधी विमा कंपनीकडे वर्ग करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

या निर्णयामुळे कंधार व दिग्रस मंडळांतील हजारो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. पीक नुकसानीनंतर अनेक शेतकरी विमा रकमेच्या प्रतीक्षेत होते. आता मंजूर झालेल्या निधीमुळे त्यांच्या खात्यावर थेट विमा रक्कम जमा होणार असल्याने आर्थिक अडचणी काही प्रमाणात कमी होण्यास मदत होईल.

याबाबत आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी सांगितले की, शेतकऱ्यांचा हक्काचा पीकविमा वेळेत मिळावा, यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. शासनाने सकारात्मक भूमिका घेतल्याने निधी उपलब्ध झाला आहे. उर्वरित प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करून पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात विम्याची रक्कम लवकरात लवकर जमा व्हावी, यासाठीही प्रयत्न सुरू राहतील अशी माहितीही त्यांनी दिली आहे.

# भोकर येथे कारगिल दिन साजरा

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. २८ जुलै -**

कारगिल युद्धात मातृभूमीच्या रक्षणासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या शूरवीर सैनिकांच्या शौर्याला आणि बलिदानाला अभिवादन करण्यासाठी कारगिल विजय दिनानिमित्त रविवारी (ता.२६)मुदखेड रोड येथील शहीद प्रफुल्लकुमार गोवंदे स्मारक परिसरात शहीद प्रफुल्लकुमार गोवंदे यांच्या प्रतिमेस पुष्पचक्र अर्पण करून विर जवानांना मानवंदना देण्यात आली. त्यानंतर स्मारक परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

देशाच्या सीमेचे रक्षण करताना वीरमरण पत्करलेल्या जवानांच्या त्यागाची आणि पराक्रमाची स्मृती नव्या पिढीच्या मनात सदैव जिवंत राहावी, तसेच देशभक्तीची भावना अधिक दृढ व्हावी, या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमाला देशप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शहीद जवानांना आदरांजली वाहिली यावेळी शहीद पिता गणपतराव गोवंदे,पोलीस निरीक्षक विश्वंभर पल्लेवाड, नायब तहसीलदार आडेपवार,मंडळ अधिकारी अनरवाड गणेश,तलाठी अनिल मुनेश्वर,नगरसेवक साईप्रसाद जटलावार,



गणेश (पप्पू) बोलेवार,सिद्धेश्वर पिटलेवाड, नगरसेवक संजय घंटलवार,विकास क्षीरसागर, नगरसेवक योगेश देशपांडे,पत्रकार शिवाजी गायकवाड,अनंता जोशी, सरपंच आत्रिक मुंगल पाटील, पत्रकार डॉ. कैलास कानिंदे पत्रकार अरुण डोईफोडे,एम.एम. धोत्रे,विठ्ठल वाघमारे, हनमंत माने,समयदान मैत्री संघाचे अध्यक्ष तथा पत्रकार जयभीम पाटील, कांतीलाल जोंधळे,पत्रकार मनोज शिंदे,धम्मा कदम,संतोष डोंगरे,संदीप नरवाडे, माधव पवार,विजय वाघमारे,नागेश सोमेबोईनवाड,राजु कोरटे,संतोष जैन,पांडुरंग तम्मलवाड,सुमेध बनसोडे,पिराजी रायभोळे, मधुकर गोवंदे,संतोष गोवंदे,रमेश दुधारे,प्रशांत हनमंते,भगवान जाधव,संभाजी धात्रक, दिगंबर कदम,गजानन कांबळे, सरवर खुरेशी,योगेश देशमुख आदी उपस्थित होते.

# माहूरमध्ये आ. भीमराव केराम यांचे अचूक राजकीय नियोजन; प्रा. राजेंद्र केशवे यांचा दणदणीत विजय

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २८ जुलै -**



नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक पदाच्या निवडणुकीत माहूर तालुक्यात आमदार भीमराव केराम यांच्या अचूक राजकीय नियोजनाची आणि प्रभावी संघटन कौशल्याची पुन्हा एकदा प्रचिती आल्याची चर्चा राजकीय व सहकार क्षेत्रात सुरू आहे. या निवडणुकीत महायुतीचे उमेदवार प्रा. राजेंद्र केशवे यांनी विजय मिळवत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख ज्योतिबा खराटे यांचा पराभव केला.

निवडणुकीपूर्वीच मतदारांशी सातत्याने संपर्क, सेवा सहकारी संस्थांमधील प्रभावी समन्वय तसेच महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मजबूत बांधणी यामुळे प्रा. राजेंद्र केशवे यांच्या विजयाचा मार्ग सुकर झाल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे. या विजयामागे आमदार भीमराव केराम यांनी आखलेले नियोजन महत्त्वाचे ठरल्याची चर्चा सर्वत्र होत आहे. विशेष म्हणजे, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघातून आमदार भीमराव केराम यांची बिनविरोध संचालकपदी निवड झाली, तर प्रा. राजेंद्र केशवे यांनी निवडणूक जिंकून संचालकपद मिळविले. याशिवाय भटक्या-विमुक्त गटातून ज्ञानेश्वर दहिफळे यांनीही विजय मिळवत संचालक मंडळात स्थान मिळविले. त्यामुळे किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघातून एकाच वेळी तीन संचालक जिल्हा बँकेवर विराजमान झाले असून हा मतदारसंघ सहकार क्षेत्रात अधिक प्रभावी ठरल्याचे मानले जात आहे. या निकालामुळे माहूर तालुक्यात महायुतीचे वर्चस्व अधिक मजबूत झाल्याची प्रतिक्रिया कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत असून, भविष्यात जिल्हा बँकेच्या माध्यमातून शेतकरी, सहकारी संस्था आणि ग्रामीण विकासासाठी अधिक प्रभावी निर्णय घेतले जातील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# स्मरणिकेसाठी साहित्य पाठवावे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २८ जुलै -**

अखिल भारतीय आंबेडकर महासभा आयोजित महाकवी वामनदादा कर्डक जयंती महोत्सवाच्या स्मरणिकेसाठी साहित्य पाठविण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष श्रावण नरवाडे यांनी केले आहे. ऑगस्ट महिन्यात होणाऱ्या महाकवी वामनदादा कर्डक जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून यात स्मरणिका प्रकाशन होणार आहे त्यासाठी वामनदादा कर्डक यांच्या जीवनावर आधारित साहित्य, बहुजन महापुरुष यांच्यावरील साहित्य ९६५७९५८५६७ या व्हाट्सअप क्रमांकावर साहित्य पाठवून सहकार्य करावे. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना राज्यस्तरीय बहुजन रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हाध्यक्ष श्रावण नरवाडे, युवा जिल्हाध्यक्ष दीपक साळवे ,अशोक हिंगोले, गणेश कांबळे ,ड .नितीन थोरात ,रंगनाथ कांबळे, जोंधळे यशवंत ,अशोक शिंगणकर, विजय कांबळे ,भुजंग कोकरे, आनंद हटकर ,सुनील गोडबोले आदि प्रयत्नशील आहेत.

# जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणूकीत माधवराव जवळगावकर विजयी

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. २८ जुलै -**



जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत हिमायतनगर गटातून झालेल्या अटीतटीच्या लढतीत शेतकरी विकास पॅनलचे उमेदवार तथा माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांनी अवघ्या एका मताने विजय मिळवत सहकार क्षेत्रातील आपले राजकीय वर्चस्व पुन्हा सिद्ध केले आहे.

अत्यंत चुरशीच्या लढतीत माधवराव पाटील जवळगावकर यांना ११ मते, तर त्यांचे प्रतिस्पर्धी विशाल राम राठोड यांना १० मते मिळाली. केवळ एका मताने निकाल लागल्याने ही निवडणूक जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरली आहे. निकाल जाहीर होताच हिमायतनगरमध्ये समर्थकांनी जल्लोष करत गुलालाची उधळण, फटाक्यांची आतषबाजी आणि घोषणाबाजी केली. विविध राजकीय, सामाजिक आणि सहकार क्षेत्रातील मान्यवरांनी जवळगावकर यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.विशेष म्हणजे, ही निवडणूक माजी मुख्यमंत्री तथा भाजपचे राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली लढविण्यात आली होती. त्यामुळे या विजयाकडे केवळ सहकार क्षेत्रातील यश म्हणून नव्हे, तर जिल्ह्यातील बदलत्या राजकीय समीकरणांच्या दृष्टीनेही पाहिले जात आहे.

## ऊसतोड कामगारांच्या विविध समस्या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २८ जुलै -**

गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रिया संदर्भात शासन निर्णयानूसार जिल्हास्तरीय समिती जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आली आहे. या समितीची नुकतीच जिल्हाधिकारी राहूल कर्डीले यांच्या मार्गदर्शनाखाली निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील ऊसतोड महिला कामगारांच्या आरोग्यविषयक विविध समस्यां बाबत जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे बैठक घेण्यात आली.

या बैठकीमध्ये ऊसतोड महिला कामगारांच्या आरोग्यविषयक विविध समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रामुख्याने बीड जिल्ह्यामध्ये ऊसतोड महिला कामगारांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असून त्यांच्यामध्ये अनावश्यकरित्या गर्भ पिशवी काढण्याचे प्रमाण मोठे आहे. ऊसतोड महिला कामगार हे फक्त बीड जिल्ह्यापुरते मर्यादित नसून ते ऑक्टोबर ते जानेवारी या कालावधीत नांदेड जिल्ह्यातील मुखेड, हदगाव, उमरी, कंधार, अर्धापूर, नांदेड येथे ऊसतोड करण्यासाठी ये-जा करत असतात. त्यामुळे अशा ऊसतोड महिला कामगारांचे अनावश्यकरित्या गर्भ पिशवी काढली जाऊ नये यासाठी जिल्ह्यांतर्गत आरोग्य संस्थेमार्फत मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात यावी. सदरील बैठकीमध्ये सूचना देण्यात आल्या.

# आ. चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त ५ दिवस विविध ठिकाणी कीर्तन सोहळा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २८ जुलै -**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते, माजी खासदार तथा लोहा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त १ ते ५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत नांदेड जिल्ह्यात विविध ठिकाणी कीर्तन व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार, जनसामान्यांचा आधारवड मा. प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी आणि धार्मिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. याही वर्षी लोहा कंधार विधानसभा मतदारसंघातील भाविक भक्तांना कार्यकर्त्यांना आणि चहात्यांना भक्तिरसात न्हाऊन निघण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. आपल्या मतदारसंघाच्या विकासासाठी सदैव तत्पर असणाऱ्या आ. चिखलीकर साहेबांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कीर्तन सोहळ्याची सुरुवात शनिवार, १ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ ते रात्री ९ वाजेदरम्यान छत्रपती चौक येथील आशीर्वाद गार्डन नांदेड येथे ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदोरीकर यांच्या कीर्तनाने होणार आहे.

रविवार, २ ऑगस्ट रोजी दुपारी २ ते ५ या वेळेत कंधार येथे दिगू पाटील लुंगारे मंगल कार्यालयात ह.भ.प. सोमनाथ महाराज सानप यांचे कीर्तन होईल.

सोमवार, ३ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत लोहा तालुक्यातील सोनखेड येथे शिवलीलाताई पाटील यांच्या कीर्तनासह शालेय साहित्य वाटप व वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

मंगळवार, ४ ऑगस्ट रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत लोहा तालुक्यातील मारतळा येथे ह.भ.प. विशाल महाराज खोले (बुलढाणा) यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे.

तर बुधवार, ५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता लोहा तालुक्यातील माळाकोळी येथे ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज बुलढाणेकर यांच्या कीर्तनाने या कार्यक्रमांची सांगता होणार आहे.

आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या धार्मिक व सामाजिक उपक्रमांमध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.